

# अरूल सरू

हर्षद मोलिश्री

# अरुल सरु

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# अरुल सरु

लेखक

## हर्षद कालिदास मोलिश्री

# अरुल सरु

## लेखक : हर्षद कालिदास मोलिश्री

ph.no. ९८६७९८९०८५/८१६९४०७२६०

hariashu3031@gmail.com

पत्ता :- १९३/२, आर बी आय, रेल्वे क्वाटर्स ५२ चाळी, डोंबिविलो पश्चिम..

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841

APP : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

www. esahitybooks

**प्रकाशन :१ जुलै२०१८**



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईत्य साहि- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# हर्षद कालिदास मोलिश्री



I am good thinker and i lIke to share my views my ideas n my stories am a good story teller...

Favorite writer.. gulzaar

My dream is to be a successful author writer and its my dream to make an movie based and written on my stories...

My blog page.. http://feeds.feedburner.com/Appbitti

I am an author aslo connected with Matrubharti and pratilipi...

I am in search of an platform where i can prove my self and get a chance to open up my talent in front of audience ...

Thank you..


## हर्षद कालिदास मोलिश्री

ph.no. ९८६७९८९०८५/८१६९४०७२६०

hariashu3031@gmail.com

पत्ता :- १९३/२, आर बी आय, रेल्वे क्वाटर्स ५२ चाळी, डोंबिविलो पश्चिम..

# अरुल सरु

अरुल सरु....

“अरे ए अरुल लवकर... चल नाहीतर तुझी सरु निघून जाईल. चल लवकर... धाव पटापट”....

“हो अश्या आज खरंच उशीर झालाय. आज जर उशीर झाला आणि भेट नाही झाली तर उद्यापासून college ला सुट्टी आहे. चल पटापट, काय रे अश्या? तुझी वहिनी आज निघून गेली वाटतं.... यार नशीबच फुटकं आहे माझं, मी ठरवलं होतं रे अश्या आज काहीही करून सरूला माझ्या मनांतलं सांगेन पण इथं तर भलतंच झालं”......

“अरुल... गेल्या 3 वर्षापासून सरुवर जीवापाड प्रेम करतो पण नुसतंच सांगायला घाबरतो”...

“अविनाश उर्फ – अश्या…. अरुल आणि अश्याची मैत्री अगदी लहान पणापासून आहे”, चाळीत तर दोघांना चड्डी मित्र म्हणून ओळखल जातं….. अश्या खूप चांगला स्वभावाचा आहे… आणि मित्रासाठी कायम स्थिर थांबणारा”….

“सरू अगदी शांत आणि स्वाभाविक मुलगी आहे अभ्यासात तर सरु नेहमी प्रथम स्थानावर…. वर्गात पहीला नंबर म्हणजेच सरु.... मित्र मैत्रीण तर सरुला scholar म्हणूनच हाक मारायचे”.......

“अश्या आणि अरुलची मैत्री चाळीत नव्हे पण college मध्येही सुप्रसिद्ध होती “...

“12 HSC परीक्षेचा शेवटचा दिवस, अश्या आणि अरुल… त्यांच्या मैत्रीप्रमाणे दोघांना सेंटरही एक लागलं होतं… मात्र सरुला वेगळं सेंटर लागलं होतं”......

“परीक्षा सुरू झाल्या त्या दिवसापासून पटापट पेपर संपवून दोघं धावत सरुच्या सेंटरखाली येऊन थांबायचे व तीचा पाठलाग करत घरी जायचे “

“पण आज काय नशीबच फुटकं”…

“अरुल चल आता घरी, आई वाट बघत असेल”.....

“हो अश्या चल जाऊयात आता काय.”...

अरुल आणि अश्या जसे मागे वळले… थक्क होऊन एकमेकांकडे बघू लागले…. बघतायेत तर काय, सरु त्यांच्या समोर ऊभी होती…...

“आज मात्र उशीर झाला होय तुम्हा दोघांना, काय..??? सरु बोलली.....

“नाय सरु आम्हाला वाटलं कि तू घरी निघून गेलीस, नाहींतर आमची गाडी तर वेळेवर आहे... हां थोडा उशीर झाला आज काय, अरुल बरोबर ना.... अश्या जरा हसूनच बोलला”.... !

“नाही असं काही नाही सरु”, अरुल थोडं घाबरूनच बोल्ला......

“हो, हो... राहू दे मला सगळंच माहीत आहे... मीच काय तरी ठरवून आलीये आज ...” सरु थोडं रागातच बोलली...

“अरे अरुल हिला तर सगळं माहित आहे... आता काय, आता तर तुझी वाट....”

“तू गप अश्या.. काही, ही बडबडू नको कळलं ना, जरा मला अरुल सोबत बोलू देत....” सरु बोलली

अरुलला काय कळेना...... कि नेमकं काय करावे. त्याला काय बोलावं हेच सुचेना.... अरुल मनातच विचार करू लागला... आज नेमकं काय पण होऊ देत पण ठरवल्याप्रमाणे सरुला आपल्या मनातलं सांगायलाच हवं....

“अरुल काय कुठल्या विचारात पडलास तू....? ऐकतोय का .....? “

तितक्यात अरूल अतिउत्साहात, अगदी प्रेमाने बोलला.......

“I love youuuuuu सरु......

सरू I love uhhhhhh….”

सरु अरुलकडे रागाने बघु लागली..... “हे काय आहे अरुल मी तुला ….”

तितक्यात सरुला अडवत मधेच अश्या बोलला.... “अरे भावा तुझा तर वाटतं घोळ झाला, हि तर नाय म्हणते…. तुझी सारी मेहनत पाण्यात”….

“अश्या गप तू…. तू आज काय मला बोलू देणार आहेस कि नाही… तुला आधीच म्हटलं ना बडबडू नकोस, जरा गप कि म...”, सरु रागातच बोली……

“सरु हे बघ मला नाही महित हे चांगलं आहे कि चुकीचं आहे, पण मी आज घरातून निघताना मनात एक विचार मांडून आल्तो.... कि मी तुला हे नक्कीच सांगणार कि माझं तुझ्यावर प्रेम आहे. सरु, तुला मी नसेल आवडतं तर ठीक आहे, मी मान्य करतो… पण तू माझं पाहिलं प्रेम आहे आणि तुला मी कधीच विसरणार नाही”…….

सरु बोलली.......

“झालं.....? हे काय आहे अरुल, माझंही तुझ्यावर प्रेम आहे मीही आज ठरवून आली होती कि जर तू आज ही नाय बोल्लास तर मी समोरून बोलेन”….

“गेल्या 3 वर्षापासून वाट पाहते कि कधी बोलशील पण तू…. तू कधी काही बोल्लाच नाही, आणि आज बोल्लास तर हे असं..... जा बोलू नको माझ्या

सोबत...... मला नाही बोलायचं तुझ्या सोबत”....असं म्हणत सरु मागे वळली... मी जाते घरी, मला नाही बोलायचं तुझ्या सोबत bye……

“अरुल अरे अरुल”…. अश्या जोर जोराने ओरडू लागला “थांबव तिला सरु जातेय......”

पण अरुल मात्र तिच्याकडे प्रेमाने एकटक बघत होता... जे घडतंय त्याला तर एक स्वप्न वाटत होतं…. तो तर सरुकडे एकटक पाहतच होता…. थोडं पुढे गेल्यावर सरु मागे वळली ….. आणि अरुलला बघून गालातच हसली आणि लाजून निघून गेली…. हे पाहताच अरुल तर जणू कुठे आपल्याच जगात हरवून गेला….. ह्रदयावर हाथ ठेवून अरुल लाजतच तिथं थांबून अश्याला बोलला......

“अश्या सरु हसली यार”....... आणि उड्या मारत नाचायला लागला…. सोबत सोबत अश्याही उड्या मारत नाचू लागला….

“अरे setting,

अग बाई माझी setting झाली….

अरे अश्या माझी setting झाली

झाली झाली झाली झाली

setting झाली”……

अरुल असं गाणं म्हणत अश्या सोबत नाचू लागला…… अरुल खूप खुश होता एव्हढा कि त्याचा आनंद गगनात मावेना.... तो तर सरुच्या विचारात हरवून गेला... असं वाटत होता त्याला कि........

“आज पर्यंत अनोळखी होतो पण आज, आज मात्र तिचा झालो”......

अरुल घरी आला.... बॅग टाकली बेडवर आणि आईला मोठ्याने हाक मारू लागला....

“आई जेवायला दे ना खूप भूक लागलीये”

“देते आधी सांग होतास कुठे तू... आज इतका उशीर कसा काय, नेहमी तर लवकर येतो ना मग आज कसा काय उशीर झाला”....

“अग आई ऐक ना... आज शेवटचा दिवस होता college चा. मग गप्पा मारत बसलो होतो मित्रांसोबत”....

“बरं थांब, बस तू आणते मी जेवण”.....

“आई बाबा कुठेत... बाबा अजून आले नाही का...??

“हो बाबा अजून आले नाही कामा वरून, चल मी जेवण वाढते तू जेवूण घे”....

जेवण करून... थोड्या वेळाने फ्रेश होऊन अरुल घरा बाहेर पडला, अश्याच्या घरा जवळ पोहोचून त्याला हाक मारली “ अश्या....”

अश्या घरा बाहेर आला.....

“काय अरुल आज तर मस्त छावा दिसतोय, सरु तर फिदा होणार तुझ्यावर”....

“गपतो का तू अश्या”....

“असं व्हय, लडकी मिली तो अब दोस्त को भूल गया ना तू, ....... अरुल दोस्त दोस्त होता”

“ए गप रे.... उगाच टाईमपास करू नकोस”...

“अरे अरुल मस्करी करतोय”......

“हो ते माहीत आहे मला”............

अरुल आणि अश्या दोघे कट्ट्यावर येऊन बसले आणि गप्पा मारत होते... चाळीत एकूण 12 रूम होते लायनीत. त्यात अरुल दुसऱ्या घरात रहायचा व सरु सातव्या घरात..... चाळीच्या समोर एक खुलं मैदान आहे व त्याला लागून एक कट्टा आहे... इथं बसल्यावर इथून सरुचं घर अगदी समोर दिसायचं....

आता अरुल वाट बघू लागला कि सरु कधी घरा बाहेर येईल .... वाट बघत संध्याकाळ झाली पण सरु काय घरा बाहेर येईना...

“अरुल बस्स कि रे. आता चल ना. काय इथं कधी चा आपण बसलोय. ती नाही येत आहे तोवर चल ना बाहेर जरा फिरून येऊया”....

“थांब रे अश्या तूला नाही कळणार. मला एकदा सरुला बघावंसं वाटतंय... येईल ती.... येईल”.

तितक्यात अरुलची नजर पडली सरुच्या घराकडे..... सरु हळूच घरा बाहेर आली... हातात बाजाराची पिशवी आणि सोबत तिच्या मामीची छोटी मुलगी तिला घेऊन अरुलच्या समोरून निघून गेली... थोडं पुढे जाऊन पाठी वळून पाहिलं आणि अरुलला बघून गालातच हसली.... अरुल पण तिच्या मागे मागे चालू लागला.... व अश्या पण अरुलसोबत चालू लागला....

सरु पुढे चालत होती व अरुल आणि अश्या तिचा मागे मागे चालत होते.... बाजारात पोचले तिघही.... सरुने बाजार घेतली व अरुल तसाच तिच्या मागे मागे फिरत होता... सरुही मुद्दाम पूर्ण मार्केट फिरत होती... सगळं सामान घेतलं व घरी जाण्यासाठी सरु निघाली... जाताना सरुच्या मामीची मुलगी बोल्ली

“ताई ताई मला chocolate पाहिजे”

सरु मागे वळली आणि जशीच मागे वळली अरुल तीला बघून थांबला.... सरु बोली.....

“हो चुटकी चल हे दादा आहेत ना ते तुला chocolate घेऊन देतील... काय दादा घेऊन द्याल ना ???

“अरुल सरुकडे प्रेमाने बघत बोलला, अश्या जा जरा समोरून एक chocolate घेऊन ये”.......

“हां आणतो थांब... चुटकी, तू चल माझ्याबरोबर. तू सांग कुठलं चॉकलेट हवं ते.” अविनाशने चुटकीचा हात धरला आणि लांबच्या दुकानात गेला.

अरुल बोलला सरुला....

“अजून राग नाही का गेला तुझा .... sorry ना “

“अरुल मी तुझ्यावर रागावले नाहीच आणि हां तू Sorry बोलू नकोस... मला नाही आवडत तू मला sorry बोललेलं. नको बोलूस”.......

“बरं! नाही बोलत. मग तुला काय आवडतं”......

“chocolate”

“हे घे अरुल... चॉकलेट” अविनाश मागून म्हणाला.

“आलास तू?”

“हो आलो आणि हे घे chocolate... “

“हे घे चुटकी” म्हणत ते अरुल ने चुटकीला दिलं... व सरुला विचारलं... “आणि तुला काय हवं आहे......”

सरु बोलली........

“आता तू भेटलास ना अजून काय नको मला माझ्यासाठी हेच बस आहे”....

“हे ऐकून अरुल खूप लाजला”.....

सरु बोल्ली “चल मी जाते उशीर होतोय...” बोलत जायला लागली.... तेव्हाच अरुल ने पाठून हाक मरून सरु ला विचारलं

“परत कधी भेटशील ..... ??”

“लवकरच” म्हणत सरु निघून गेली.....

अश्या आणि अरुल पण घरी निघून आले.....

घरी आल्यावर ... बाबा अरुलला बोलले “काय रे... कुठे होतास”......

“काय नाही बाबा अश्या सोबत होतो बाहेर गप्पा मारत बसलो होतो”......

“नुसतं गप्पाच मारा... पेपर कसा होता आज चा.. ??”

“हो बाबा छान होता चांगला गेला पेपर”.......

“बरं आता पुढे काय मग ... 12 वी नंतर”....

“काय नाय बाबा निकाल तरी लागूद्या त्या नंतर मग college..... पुढे continue करायचा आहे मला 13 वि”......

“बरं जा हाथ पाय धुऊन घे आणि बस.....”

“हो बाबा”.........

अरुल बसलाच होता कि अचानक त्याने आवाज ऐकला..

“काकू आहात का घरी?”

“हो आहे ये आत...” अरुल ची आई बोलली...

अरुल ने बघितलं तर सरु आली होती.. दोघे एकमेकांना बघतच होते कि तितक्यात... अरुलची आई बोलली.....

“हां बोल गं काय झालं...?”

“अहो काय नाही, काकू, ते थोडं अद्रक हवं होतं मी विसरली आणायला... बाजारातून”

“बरं थांब मी देते आणून... हा....” जशी अरुलची आई आत गेली......

“सरु हळूच बोलली अरुलला...ऐक ना.... मागे येऊन भेट मैदानच्या पाठी”.....

तितक्यात “हे घे ग अद्रक...” म्हणत आई बाहेर आली.

“ हा द्या काकू.. चला येते हां मी...” म्हणत अरुलकडे बघून हसत सरु निघून गेली......

अरुल पण लगेच आई ला बोलला “आई येतो मी... बाहेर जाऊन जरा....”

तो लगोलग मैदानाच्या मागे आला... येऊन बघतो तर सरु तिथं थांबली होती... अरुल तिच्या बाजूला जाऊन थांबला... आणि बोलला.....

“चांदणी हि रात...

हातात असो तुझा हाथ.....

जीव जाई गुंथून....

तुझ्या प्रेमात आज “.....

हे ऐकताच सरु लाजून अरुल कड़े पाहू लागली.......

“अरे wahhhh खूप छान शायरी करतो तू... आवडली मला...”

“आणि मी....??

“हो, हो तूही आवडलास”.....

“आज तुला पाहिलं न आपोआप शायरी शिकलो”......

“अच्छा.......” सरु अगदी प्रेमाने लाजून बोल्ली व गालातच हसू लागली.....

“मला शायरी आणि कविता करणं खूप आवडतं सरु पण... मी कधी कोणासमोर केली नाही.. आज तुला इथं पाहताच तोंडातून शब्द आपोआप फुटले.”

“अच्छा! हो?” सरु....

“सरु तू खूप आवडतेस मला”....

“हो अरुल तूही मला खूप आवडतो... आणि इथं हेच सांगायला तुला मी बोलावलं आहे”......

काय सरु...??

“तेच जे तू दुपारी मला बोल्लास ना”....

“हो पण काय...???”

थोडं वेळ शांत थांबून सरु ने मानवर केली व अरुलच्या डोळयात बघू लागली.... व काही क्षणा नंतर हळूच बोली.....

“अरुल I Love U......” सरु खाली मान टाकत लाजूनच बोली... आणि अरुल तर नुसताच हे ऐकून वेडा झाला... सरु चा हाथ पकडून नाचायला लागला.... “I love u too सरु” बोलत प्रेमाने उत्तर दिलं अरुल ने....”

थोडा वेळ गप्पा मारल्या नंतर सरु बोलली...

“अरुल.. बरं ऐक उद्या मी गावाला जातेय थोड्या दिवसानी येईन...” अरुल उदास होऊन बोलला

“लगेच गावाला... चाललीय...?”

“हो शोना “... म्हणत सरु ने प्रेमाने उत्तर दिला...

अरुलही प्रेमाने बोलला बरं “ शोना जा... आणि लवकरच ये......”

“हो लवकरच येईन मी... तुला तिथून कॉल करेंन मी.... हो चालेल कर.... bye शोना” बोलून सरु तिथून निघून गेली......

अरुल थोडा वेळ तिथंच थांबला.... व नंतर घरी निघून आला.........

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी.... सरु चा कॉल आला... अरुल ने फोन उचलला... “हा शोना बोल.... भेट ना आता कालच्याच जागेवर.... बरं येतो... हो ये” म्हणत सरु ने कॉल कट केला....

अरुल घरातून निघाला व मैदानाचा इथं जाऊन... थांबला, पाठून सरु आली... सरु ला पाहताच अरुल तर तिला बघतच राहीला....

सरूने लाइट ब्यु कलरचा फ्रॉक घातला होता. त्यावर डार्क निळया रंगाची बारीक फुलांची डिझाईन होती जी तिच्या छातीवर मोठी मोठी होत गेली होती. तिने केसांचा बो मागे बांधला होता आणि कपाळावर केसांचा हलकासा फुगा केला होता. कानात झुमके होते आणि त्यांच्या लाल हिरव्या मण्यांचा प्रकाश तिच्या

गोऱ्या गालांवर पडला होता. तिने ओठांवर लावलेल्या लिपस्टिकमुळे तिचे मुळातच टपोरे ओठ अतिशय खुलून दिसत होते. आणि मूळ काळयाभोर डोळयांना आयलायनरने अजूनच शोभा आली होती. त्या सॅटिनच्या मऊशार ड्रेसमध्ये सरूला पाहून अरुलच्या छातीत बुलेटचं इंजेन सुरू झालं.

आल्या आल्या सरु बोलली.......

“शोना कशी दिसते मी”....?

2 minute अरुल सरु ला असंच बघत बसला.... आणि मग प्रेमाने... हळूवार घोगऱ्या स्वरात बोलला......

“स्वप्ना सारखी सुंदर.... फुला सारखी छान.....

लाज तुझ्या चेहऱ्यावर शोभून दिसे आज....”

हे ऐकताच सरूचे गाल त्या मण्यांहूनही लाल झाले. सरु लाजून बोल्ली......

“wahh शोना.... खूपच छान. खरंच पडेन मी आता”....

“अरे शोना मी आहे ना! असं कसं पडू देणार मी तुला”..... त्याला म्हणायचं होतं की “... तर तुला घट्ट धरून ठेवायचा चान्सच मिळेल मला.” पण त्याला हिंमत झाली नाही.

“हो शोना नाहीच पडू देणार तू”......

“शोना.....खूप सुंदर दिसतेस आज तू खरंच, आज तर असं वाटय कि स्वप्नसुंदरी ला बघतोय....... नेहमी माझ्या स्वप्नात तू अशीच सजून येऊन मला विचारायची... अरुल कशी दिसते मी आणि मी प्रेमाने तुला बोलतो...

“स्वप्नात येऊन करते इशारा...

समोर का येत नाहीस...

लावते या मनाला माया...

समोर का येत नाहीस...

प्रेमाने नजरेचे तिर चालवते....

समोर का येत नाहीस...

स्वप्नात जे दिसतं प्रेम ते

समोर का करत नाहीस”....

“बस शोना अजून किती तारीफ करशील”... असं थोडी आहे? हे तर तुझा मोठेपण आहे कि... तू अशी shayari मध्ये मला व्यक्त करतोस... नाहीतर मी कुठे येवडी सुंदर आहे”.....

“Achaaa... म्हणजे मी खोटं बोलतोय का...??

“नही शोना... आहे बस जसं तू बोलतोस ना तशीच. खुश?”.....

“बरं ते सोड मी काय म्हणते,”

“बोल ना काय बोलतेस,” अरुल तिच्याजवळ सरकत बोलला.

“हां बोलते कि शोना... धीर धर ना जरा ...... मी ना,”

“हा तू ना काय शोना....” अरुल अजून जवळ सरकत बोलला. आता त्याचा हलकासा स्पर्श सरूला जाणवू लागला होता. आणि सरूचे ऊष्ण श्वास त्याच्या छातीला जानवू लागले होते.

“शोना मला बोलू देना....” सरू किंचित मागे सरकत बोलली. आता तिची पाठ मागच्या झाडाला टेकली होती आणि तिला आपला ड्रेस मळेल याची भिती होती.

“सरु मी तेच वाट पाहतोय कधी बोलशील”

“अरे बोलते ना... असं करणार असशील तर मी जाते”...

“नाही शोना बोल तू बोल”....

“हा बोलते मी आज गावाला चालीये ना मग म्हटलं गावाला जायच्या आधी तुला एकदा भेटून जाते मनाला आराम मिळेल”.....

“मस्त वाटतंय खूप आनंद होतोय पण मन उदास आहे कि तुझ्याकडून लांब जातेय पण... काय... जावं लागणार”

“हो शोना जा आणि लवकरच ये... मी इथंच वाट बघेन तुझी”...

“हो शोना.. लवकरच येईन मी, तुला ना मेसेज करेन आणि जमलं कि फोन करेन”....

“बरं जाते मी उशीर होतोय... शोना जाते मी लवकरच भेटू.....”

“शोना....

“हा सरु बोल...”

“सरु ने अरुलला आपल्या मिठीत घेतलं”.... अरुल थर्थरला... त्याला हे हवं होतं पण त्याला भिती वाटत होती आणि हे तिच्याकडून अजिबात अपेक्षित नव्हतं. त्याला एकाच वेळी स्वर्गसुख वाटत होतं आणि भितीही. ही मिठी कधीच संपू नये असं वाटत होतं.

“सरु कोणतरी बघेल आपल्याला..” म्हणत तो लांब झाला...

सरु लगेच तिथून निघून गेली....अरुल थोडा वेळ तिथंच थांबला... आणि सरु ला... जाताना बघून मग तिने जेव्हा त्याला मिठीत घेतलं तो क्षण आठवून खुश झाला.. आणि हसू लागला... थोडा वेळ थांबून... अरुल घरी निघून आला...

अरुल ला... आज काय झोप लागेना नुसतं सरुच्या विचारात मोबाईलमध्ये गाणे ऐकत होता... प्रत्येअ गाण्याची प्रत्येक ओळ जणू काही त्याच्यासाठीच बोलली जाते असं त्याला वाटत होतं. तितक्यात मेसेज ची रिंग वाजली .... बघतोय तर सरु चा मेसेज आला....

“जास्त वेळ जागा राहू नकोस... शोना झोप आराम कर.... Good night.. take care”

“मेसेज वाचताच अरुल खूप खूष झाला... परत अरुल नेही सरु ला Good night... take care मेसेज पाठवला व झोपला “.........

सकाळी जसा अरुल उठला... सगळयात आधी मोबाइलमध्ये बघितलं सरु चा मेसेज आलाय कि नाही.. बघितला तर मेसेज नव्हता... अरुल ने Good morning... मेसेज केला... व उठला...

दुपारी अश्या आला घरा बाहेरुनच अरुल ला हाक मारली अरुल...... हाक ऐकून अरुल लगेच घरा बाहेर आला व दोघे जाऊन कट्ट्यावर बसले...

अरुलने त्याच्या आणि सरुमध्ये झालेला कालचा संवाद पूर्ण अश्याला सांगितला.... दोघे तिथं गप्पा मारत बसले होते... पण अरुलचं अर्ध लक्ष मात्र मोबाइलवर होता... कि सरुचा काही कॉल मेसेज आला का....थोडा वेळ गप्पा मारून दोघंही आपआपल्या घरी निघून आले....

आज अरुलला करमत नव्हतं..... संध्याकाळी अरुल मैदानाच्या पाठी जाऊन बसला... तिथं जाऊन सरुच्या विचारात गुंतला... तेव्हाच तिथं अश्या आला...

“काय रे भावा कधी चा शोधतोय मी तुला... आहेस कुठे तू”

“हे काय इथं, मी इथं बसलोय”

“हा ते बरोबर. पण इथं काय करतोय? चल कि आपल्या कट्ट्यावर तिथं जाऊन बसूया”....

“नाही इथंच बस”...

“मला माहीतेय सरु ला काल इथं भेटला होतास म्हणून इथं बसला आहेस ना तू ....?”

“हो रे भावा,”

“आठवण येते ना रे तुला सरुची...”

“हो अश्या खूप आठवण येते... अजून 2 दिवस झाले मनातलं तिला सांगितलं... आणि आज ती गावाला... आहे. ती काय करत असेल... तिला पहावंसा वाटतंय... काय करू??? आज दिवस भर तिला पाहिल नाही मी बोललो पण नाही, मनात कसा तरी तळमळ होतेय”....

“असं होय. पक्का आशिक झाला आहे यार तू”.....

“अरे तू काळजी का करतो हे बघ भावा तू टेन्शन का घेतोय फोन येईल कि तिचा... नाहीतर तू कर”...

“नको ती समोरून करेल तिने सांगितलं मला...”

“बरं....असूदेत”...

थोड्या वेळा नंतर मोबाईलची रिंग वाजली... मोबाईल बघताच अरुल खुश झाला... सरुचा फोन होता...

अश्या बोलला... “भावा नंतर मजा घे आधी फोन उचल, हा... अरुल ने फोन उचलला....

“हॅलो शोना... काय करतोय माझा शोना.... काय नाही शोना.. तुझ्या फोनचीच वाट पाहत होतो... तुझा आवाज ऐकला बरं वाटतंय आता”....

“मलाही शोना... खूप मस्त वाटतंय... तुला माहीतेय मी ना इथं गच्चीवर येऊन बोलतेय तुझ्यासोबत... इथुन ना आभाळ किती सुंदर दिसतंय... चंद्र पण बघ किती छान दिसतोय... आणि त्याऊन भारी मी तुझ्यासोबत बोलतेय लपून लपून... मस्त वाटतंय शोना”.... अच्छा!

“हो शोना मग काय सवाल ??

“नाही शोना कशी आहेस तू ठीक आहेस ना... जेवलीस का तू”...

“हो मी ठीक आहे. नाही जेवायचं आहे अजून.. तू कसा आहेस? जेवलास?”...

“नाही अजून जेवायचं आहे. आणि मीही ठीक आहे सरु.... तुला माहितेय सरु जेव्हा ना तू प्रेमाने शोना बोलते ना खूप मस्त वाटतं यार... अगदी “ special “ असल्या सारखा”...

“अरे वाटतं काय आहेसच तू स्पेशल मलाही जेव्हा तू सरु बोलतो ना खूप आवडतं”....

“हो सरु,” अरुल बोलत बोलत शांत झाला

सरु बोलली हॅ”लो अरुल काय झालं बोलना...”

अरुल बोलला "हो शोना बोलतोय ना ह्या शांत वातावरणाची मज्जा घेतोय. तू पण जरा ह्या शांत वातावरणाला बघ. त्याची जाणीव कर.... shhhhhhh हो अरुल.... hassssssh"

"चमक भरी हि चांदणी आणि चमकती हि रात...

मनात तुझा भास आणि सोबती न तुझा साथ...

हेच तुझ प्रेम कि सोबत आहेस तू माझा आज...

लांब असूनही आहेस मनाच्या पास.... "

है ऐकतच सरु प्रेमाने हळूच स्वरात बोली.... "love u so much shonaaaa"...

व थोडा वेळ बोलून... मग सरु ने फोन ठेवला व अरुल आणि अश्या घरी निघून आले...

दिवस असेच जात राहिले रोज संध्याकाळी सरुचा फोन यायचा व... दोघं मस्त प्रेमाने हसत हसत एकमेकांसोबत बोलायचे... आपल्या बोलण्यात दोघं इतकं रमून जायचे कि... जणु जगात कोण दुसरा नाहीच....

एक दिवस अरुल मैदानाच्या इथे एक झाडाखाली पाठ करून... बसला होता स्वतः बोलत होता...

"एक क्षण येऊन दे साथ मला....

एक क्षण दे हातात हाथ माझ्या...

दर क्षण जाई पाहता वाट तुझी.....

एक क्षण दे श्वासात श्वास माझ्या...

एक क्षण येऊन दे साथ मला....

क्षण भरची आहे मर्जी माझी...

बस एक क्षण ची आहे अर्जी माझी...

एक क्षण समोर येना माझ्या.

मिठीत तुझ्या घे ना मला....

आता क्षण भरही राहावत नाही.... बस

एक क्षण येऊन दे साथ मला”.........

“अरुल एक क्षण नाही... माझ्या जीवनाचा प्रत्येक क्षण...प्रत्येक क्षण तुझा आहे, आपला आहे”......

अरुल हे ऐकताच उठला व वळून बघतो तर... सरु समोर थांबली आहे... सरुला बघताच अरुलचे मन भरून आले... व सरुचे डोळेही पाणावले..... दोघं शांत थांबून, बस काही ना बोलत एकमेकांकडे पाहू लागले..... जणू आज ते नव्हे पण त्यांची नजर बोलतेय... काही क्षण नंतर शांत होऊन अरुल बोलायला... गेला तितक्यात

सरु ने त्याला आपल्या मिठीत घेतलं...

दोघं थोड्या वेळा नंतर एकमेकांना पाहत होते तेव्हा अरुल बोलला....

“खूप उशीर केलास यायला शोना.... हो शोना आता नाही जाणार कुठे मी बस तुझ्यासोबतच राहणार मी... love uhh so much.... शोना.... love uhh too... सरु”.....

“कधी आलीस तू गावावरून.. आताच आली जशी घरी पोहोचली तशी तुला भेटायला इथं आली... मला माहित होता तू इथेच माझी वाट पाहत असशील.... हो सरु रोज इथेच बसून तुझी वाट पाहत असतो”....

थोडा वेळ बोलून.... व दोघं थोड्या वेळा नंतर घरी निघून आले....

आता रोज असंच सरु आणि अरुल भेटू लागले... इथं अरुल सरुचं प्रेम हळू हळू पूर्ण चाळीत पसरलं... चाळीतल्या सर्व मुलं व मुलींच्या तोंडावर बस एकच नाव अरुल सरु.....

त्यांचं प्रेम दिवसेंदिवस चाळीत चर्चित होऊ लागलं..... व दोघांचं एकमेकांवर प्रेम वाढू लागलं...

हीच चर्चा एक दिवस त्यांच्या घरापर्यंत... पोहचली....

आज result कळले सरु, अरुल व अश्या पास झाले... नेहमीप्रमाणे सरु या वेळीही 1 नंबर ने उत्तीर्ण झाली...

सगळं चांगलं चालू होतं... पास झाले म्हणून सरु आणि अरुल पण खूप खुश होते... आज त्यांनी ठरवल्याप्रमाणे celebrate करण्यासाठी तिघंही... भेटले

व celebrate करत होते... सरूने तिच्या आवडीचा अबोली कलरचा टॉप घातला होता तर अरुलने डार्क जीन्स आणि वर ग्रे कलरचा टी शर्ट घताला होता. नेहमीप्रमाणे कॉलर वर करून आणि सरूचा हात हातात धरून तो चालत होता. आजूबाजूला गर्दी असल्यामुळे अनेकदा त्यांचे सर्वांग एकमेकांना स्पर्श करत होते. इतरांचा धक्का लागू नये म्हणून त्याने तिला मागून हात टाकून अजूनच जवळ खेचले. नेमके त्याच वेळी सरुच्या काकांनी सरुला... अरुल सोबत हाथ पकडून चालताना पाहिलं.....

पार्टी मस्त झाली. सरूच्या पहिल्या नंबरने सरूपेक्षा जास्त आनंद अरुललाच झालेला. त्याने तिला एक सुंदर मेकप बॉक्स गिफ़्ट घेतला. एक स्कार्फ़ही दिला. तिनेही त्याला आणि अश्याला एक एक कडं घेतलं. सरु खूप खुश होती. हवेवर तरंगतच ती घरी पोहचली.

घरी पाऊल ठेवताच बाबांनी तिला विचारलं....

“कुठे होतीस...?? सरुचे बाबा खूप रागात होते”....

“सरुने सहज सांगितलं बाबांना... बाबा सांगून गेलते ना आम्ही सगळे मित्र मैत्रीण... Pass झालो म्हणून celebrate करतोय”....

तेव्हाच आई ओरडली .....”सरु हे काय आहे हेच शिकवलं का आम्ही तुला... हे सगळं काय आहे आणि कधीपासून चालू आहे”...

सरुला काय सुचत नव्हतं. पण एव्हढं मात्र सरुला कळलं कि घरी अरुल बद्दल कळलं ... सरु खूप घाबरली होती कि आता काय होणार...

आई बोलली “सरु बोलशील काय”...

सरूची आई रडत होती व आईला बघून सरुही रडायला लागली... बाबाही खूप टेन्शनमध्ये होते... शांत डोक्यावर हाथ ठेवून बसले होते... सरुची आई सरुला खूप ओरडली... “काकांनी पहिला तुला त्या पोरा सोबत सरु... तू त्या पोराचा हाथ पकडून चालत होतीस....”

“तू शांत हो..” सरु चे बाबा सरुच्या आई ला म्हणाले....

“अहो काय शांत बसू...?”

“मी आताच जातो त्या मुलाच्या घरी ....”

सरु काहीच बोलू शकली नाही...

सरु खूप रडत होती... उत्तीर्ण झाली याचा आनंद एका जागी व घरात कळलं याचा दुःख एका जागी... सरुला काही कळे ना... कि काय करावे...

इथं सरुचे बाबा... अरुलच्या घरी आले... अरुलचे बाबा...

“अरे या राव कसा काय आज....सरु उत्तीर्ण झाली ना गुणी आहे मुलगी तुमची या वेळीही प्रथम आलीये अभिनंदन”....

“हो तुमचं अभिनंदन तुमच्या जवळ ठेवा... कुठे आहे तुमचा लाडका... समजून ठेवा त्याला माझा पोरीच्या पाठी लागलाय.... त्याला सांगा माझ्या मुलीचा नादी लागू नको”.....

हे ऐकताच अरुल चे बाबा...बोलले “ अहो ऐका आधी तुम्ही आत या बसून... मला सांगा काय झालंय...”

सरुच्या बाबांनी अरुलच्या बाबांना व आई ला... सगळं सांगितलं व त्यांच्याकडून हे खात्री करून घेतली कि अरुल आता सरु ला भेटणार किंवा बोलणार नाही... आणि सरु चे बाबा घरी निघून आले....

अरुल जसा घरी आला... बाबांनी त्याला हाक मारली

“अरुल कुठ गेलतास”...

“बाबा बाहेर होतो मित्रांसोबत”....

“बरं जेवून घे मग मला आणि तुझ्या आईला... तुझ्यासोबत बोलायचं आहे”....

“बाबा काय झालं आज घरात एवढी शांतता का आहे मी आज पास झालो बाबा तुम्ही खुश आहात ना”...

“हो बाळा खुश आहे मी”

“आई काय झाला काय तरी झालंय वाटतं”...

“ऐकलंस ना बाबा काय म्हणाले जेवून घे आधी... बरं आई” ......

अरुल विचार करू लागला... नेमकं त्याला कळे ना कि झालंय काय... त्याच विचारात जसं तस जेवून... त्याने बाबांना विचारलं... “बाबा काय झालंय”... अरुल चे बाबा बोलले...

“अरुल ऐक मी तुला काय सांगतोय... लक्ष देऊन ऐक,”

“हो बाबा ऐकतो...”

“अरुल तू माझं एकुलता एक मुलगा आहेस.. तुला कोण काय बोलणार किंवा कोण तुझ्याबद्दल काय बोलेल हे मला व तुझा आईला.. नाही आवडत, बाळा मुलीसोबत फिरणं फक्त प्रेम नसतं... खरं प्रेम त्या मुलीला मिळवण्यासाठी आपण चांगल्या मार्गावर चालून कसं यश मिळवतो.... हे असतं खरं प्रेम”... “मी जास्त काही नाही बोलत पण... एव्हढेच कि मी आणि तुझ्या आईने हे ठरवलं आहे... आज नंतर तू सरुला कधी भेटणार नाहीस, सरु सोबत तू बोलणार नाही बस”....

“बाबा पण झालं काय...??

“हे बघ अरुल, सरुच्या बाबांना मी... वचन दिलंय आणि तिच्या बाबांनाही खात्री दिली आहे कि... या पुढे सरु ला तू नजर वर करून नाही बघणार”.....

“बाबा माझं ऐका तरी”...

“अरुल बस जसं बाबा बोलले तसच करायचं बस...” आई रागात बोल्ली...व अरुल या पुढे काय बोलू शकला नाही...

अरुल जाऊन बेडवर झोपला... झोप तर काय लागे ना... अरुल मात्र विचारात गुंतला होता...सरुची काय हालत असेल ती जेवली असणार कि नाही.. तिचे बाबा काय बोलले असणार तिला... पूर्ण रात्र अशीच निघून गेली... व तिथं सरुचीही तशीच अवस्था होती सरु जेवलीही नव्हती... व सरुचे आई बाबा सरु सोबत बोलतही नव्हते... पूर्ण रात्र सरुने रडत व अरुलचा विचार करत काढली.....

दुसऱ्या दिवशी... अरुल अश्याला... भेटला व त्याला काल जे सगळं घडलं ते सविस्तर पणे सांगितलं... अरुलने अश्याला सांगितलं कि मला एकदा सरुला बघायचं आहे... पण हे शक्य नव्हतं..... रात्रंदिवस असेच गेले... अरुल ना धड

कोणासोबत बोलतोय ना... धड जेवतोय... दिवस.. दिवस भर बस मैदानाच्या मागे झाडाखाली बसून असतो... या विचारात कि कधी तरी तिथं सरु येईल....

एकाच चाळीत रहायचे म्हणून एकमेकांना बघणं शक्य होतं पण... अरुलला सरु सोबत बोलायचं होतं... आणि तो दिवसही आला... जेव्हा इतक्या दिवसांनंतर आज अरुल सरुला... भेटू शकतो...

आज College चा पहिला दिवस... सरु Collegeसाठी निघाली... अरुल रस्त्यात सरुची वाट बघत थांबला.. होता... सरुला बघताच तो सरु समोर आला... व प्रेमाने बोलला

“सरु कशी आहेस... माझी शोना... खूप दिवसांनी बघतोय तुला... आज मन भरून तुझा सुंदर चेहरा बघणार मी... या चेहऱ्याला.. मी माझ्या मनात lock करून ठेवेन...” अरुल असं हसत प्रेमाने बोलला...

पण सरु खाली मान टाकून थांबली होती... व काय न बोलताच तिथून जायला लागली... तेव्हा अरुल ने सरुला हाक मारली...

“सरु काय तरी बोल सरु काय नाही होणार, आपल्या आईबाबांना आपली काळजी आहे... म्हणून तेही त्यांच्या जागेवर बरोबर आहेत.. तू घाबरू नकोस... मी आहे ना तुझ्यासोबत सरु सगळं ठीक होईल.... जे होतं ते सगळं चांगल्यासाठीच होतं”....

पण सरुने काय उत्तर नाही दिलं व तिथून रिक्षात बसून निघून गेली..

अरुल सरु ला हाक मारत तिथेच थांबून राहिला...

“सरु सरु... ऐक ना शोना ऐक ना...” बोलत अरुलच्या डोळयात... पाणी आलं “सरु, सरु..... शोना थांब ना....”

अश्या ने अरुलला सावरलं व समजवून... college ला... घेऊन आला... अरुलच मन कुठेच लागत नव्हतं....सरुला कसं समजवायचं बस हाच विचार त्याचा डोक्यात चालू होता...

तेव्हाच अश्याने अरुलला सांगितलं...

“थांब... मी येतो... जाऊ नकोस कुठे इथंच बस”...

व तो निघून... गेला... काही वेळा नंतर तो परत आला व अरुलला बोलला...

“मित्रा काळजी करू नकोस.. मी सरुच्या मैत्रीणला... भेटून आलोय व तिने मला... सांगितलंय कि ती सरुला.. Collegeच्या पाठी घेऊन येईल.... College सुटल्यावर जाऊया... आपण”....

“तेव्हा जाऊन अरुलच्या जिवात जीव आला.. अश्या बोलला अरुलला... भावा आता तरी हस जरा... व अरुल थोडं गालातल्या गालात हसला”...

अरुल आणि अश्या सरुची वाट पाहत Collegeच्या मागे... येऊन थांबले होते... थोड्या वेळा नंतर सरुला येताना बघून अरुलचे हाथ पाय थरथरायला लागले... मनात कसं तरी होत होतं त्याच्या...

“अरुल मी आहे बिंदास बोल काय ...... बोलायचं ते टेन्शन घेऊ नकोस बोल तू All the best.. भावा, अश्या अरुल ची हिमत वाढवत बोला”...

सरु अरुलच्या समोर येऊन थांबली व दोघं शांत थांबले... काय न बोलता... दोघं बस एकमेकांना बघत होते, थोड्या वेळा नंतर अरुलने सरुचा हाथ पकडला सरुने हाथ झटकला व वर बघून. बोलली...

“अरुल मला विसरून जा... विसरून जा मला... विसरून जा... विसरून जा”...

“मनातल्या मनात कुठे तरी रुसून गेलं सारं...

बस एक चूक आणि जग हरवून गेलं सारं”...

अरुल एक साधारणसा मुलगा... पण त्याची Love story साधारण नाही... सरु चं रुसणं बरोबर आहे पण त्याला मात्र सोडून जाणं बरोबर नाही पण ती तरी काय करणार तिच पण बरोबर आहे......

सरुकडून Break up.... हे ऐकून अरुल अगदी शांत पणे सरुच्या चेहऱ्याकडे पाहु लागला... अरुल ला मात्र हे कळे ना कि काय करावा, काय बोलावं व सरु बोलली...

“अरुल मला विसरून जा, हे दिवस कशे जगली आहे मी ते मला माहित आहे.. नाही बघवत नाही करमत आई बाबांना असं मी नाही बघू शकत मला माफ कर चूक झाली माझी... मी तुला आधीच हे सगळं Clear करायला हवं होतं... सगळी माझीच चूक आहे तू चांगला आहेस. माझ्यापेक्षा better कोण तरी भेटेन

तुला. मी खरंच तुझ्या लायक नाही खरंच sorry... पण मी आई बाबाच्या पुढे नाही जाऊ शकत".......

अरुल काहीच नाही बोलला बस शांत पणे सगळं ऐकून घेतलं... सरु तिथून निघून गेली... व अरुल तिथंच अश्या सोबत थांबून रायला.. अश्या अरुल ला समजवत होता... सग ठीक होईल असं आश्वासन देत होता... तेव्हा अरुल स्वतःची शांतता तोडत बोलला....

"अश्या तुला महितेय... सोड. काय बोलू. आता सोड. जाऊदे"......

"अरुल नको विचार करूस होईल सग ठीक थोडं वेळ दे जीवनाला होईल सग ठीक"......

"हां अश्या होईल सगळं ठीक मी करेंन सगळं ठीक"...... असं बोलून काय क्षण शांत थांबून अरुल उदास होऊन बोलला.....

"हे अश्या तुला माहित आहे का तो दिवस, काय दिवस होता यार... खूप मज्जा आलती अपूण संगे Picnic ला गेल्तो तेव्हा... सरु आणि मी एकाच सीटवर बसलो होतो येताना सरु माझ्या खांद्यावर डोकं ठेवून झोपली होती... किती मस्त दिवस होता यार fisrt time त्या दिवस सरु माझ्या बाजूला बसली होती खांद्यावर डोकं ठेवून झोपली होती... आणि मी, मी तर तिच्या स्वप्नात गुनथुन गेल्तो. केव्हा अपूण घरी पोचलो काय कळलंच नाही मला... खूप मस्त दिवस होता तो...., आणि ते अश्या सुट्टीनन्तर जेव्हा सरु गावाला गेली होती तेव्हा... रोज तिच्या call ची वाट पाहत मैदानात झाडाखाली बसून असायचो... मस्त तिच्या आठवणीत शायरी करत"... जुनी आठवणी करत अरुल शांत झाला व काही क्षण नन्तर बोलला....

“प्रेम मात्र प्रेम नाही पण जग बनून जातं....

ज्यावर करतो प्रेम तेच का आपल्याला विसरून जातं”...

“अश्या मी काय करू यार... सरु हे कसं बोलू शकते मला... मी कसा विसरेन तिला? कसं शक्य आहे हे...?”

“अरुल समजून घे, आता सध्या काय बोलता काम नाही... लक्षात ठेव जे होतं ते चांगल्यासाठी होतं... मग विचार करू नकोस चल घरी सग चांगलंच होईन.. चल घरी चल”....

अश्या अरुल ला समजवत घरी घेऊन आला...

“चल अरुल bye जा घरी आणि काळजी घे... उद्या भेटूया चल”....

“हो उद्या भेटू bye”... म्हणत अरुल घरी आला...

“कुठे होतास इतका वेळ एवढा उशीर होय पर्यंत करत काय होतास बाहेर”... बाबांनी रागात विचारलं

“काही नाही बाबा असंच बसलो होतो”... असं म्हणत अरुल जाऊन पलंगावर वर झोपला...

“अरुल, अरुल काय झाला बरं नाहीये का, डोक दुखतंय का देऊ का चेपून”..... म्हणत आईने प्रेमाने विचारलं व प्रेमाने केसात हाथ फिरवू लागली आई...

आई ने डोकं चेपून दिलं व अरुल शांत निवांत झोपला....

सरु इथं विचार करते, जे केलं ते ठीक केलं कि नाही... अरुल सध्या काय करत असेल त्याने जेवण केलं असणार कि नाही सरु ला अरुल ची खूप काळजी वाटत होती, सरु विचार करू लागली....

*"सरु...... बघ ना समुंद्रा, यार किती भारी आहे मस्त ना"......*

*"अरुल थांब ना....."*

*"हा सरु बोल थांबलो.. शोना हाथ पकड ना"....*

*अरुल ने प्रेमाने सरु चा हाथ पकडला घट एकदम..... सरु बोलली..... "अरुल मस्त वाटय तुझ्या सोबत इथं तुझा हाथ पकडून समुंद्राच्या किनारे किती मस्त Feeling आहे".....*

*"हो सरु मला पण मस्त वाटय एकदम Magical, मी पहिल्यांदा आलोय beach वर... तेही तुझा सोबत मस्त वाटतंय हातात तुझा हाथ सोबतीला हा समुंद्रा... आणि किती मस्त गार वारा आहे"....*

*"हो ना, अरुल चल कट्यावर बसूया".....*

*"हो शोना चल".......*

*दोघंही कट्यावर येऊन बसले... सरु बोलली...... "शोना ऐक ना लवकर निघया हां घरी 5 वाजे पर्यन्त पोहचावा लागणार...... नाहीतर बाबा खूप ओरडले".....*

“हो जाऊया ना अपूण tension घेऊ नकोस तू तुझ्या मैत्रीण ना inform केलाय ना तू”.....

“हो केलाय ना थांब तरी परत मी एक फोन करून सांगून देते”....

“हो सांगून टाक”..... सरु ने तिच्या मैत्रीण ला फोन लावला...

“Hello.... पूजा ऐक ना अग मी अरुल सोबत आहे इथं marines ला आलीय बोलली होती ना तुला”.....

“हो राणी महितेय काय झाला का”...

“अग नाही काय नाही झाला, फक्त लक्षात ठेव बाबांचा काय फोनबिन आला ना घरून तर recieve करू नकोस हा”...

“हो ग राणी नाही करत ooook, enjoy कर तू... आणि जा वेळेवर घरी”....

“हो जाते चल मग बोलते नन्तर”.....

“हा ठीक आहे bye”......

“हा bye ठेवते चल” ....... सरु ने कॉल ठेवला...

“Hmmm... सांगितलं”....

“ook चल काय खायचा का शोना”...... अरुल ने विचारलं...

“हो शोना चल खाऊया मी डब्बा आणलाय मस्त मी भरवते तुला”...

*“अरे वाह! तर तर मज्जाच आहे माझी”......*

*“अच्छा”...*

*“हो बच्चा”..*

*“बरं चल”.....*

*सरु ने डब्बा काढला व अरुल ला प्रेमाने भरवलं.. आणि अरुल नेही सरु ला भरवलं... डब्बा खाऊन मग अरुल ने mobile मध्ये cords connect केले.. आणि त्याचा आवडीनुसार जुने हिंदी गाणे ऐकु लागला... दोघे जण cords share करून गाणे ऐकत होते व स्वतःही गाणे म्हणत होते....*

*काही वेळ नन्तर मग सरु बोलली... “शोना गोळा.. मला हवाय आता चल ना खाऊया”.....*

*“हो शोना चल खाऊया”.....*

*अरुल जाऊन गोळा घेऊन आला व दोघंही कट्ट्यावर बसून समुंद्राची लाटं enjoy करत.. गोळा खाऊ लागले... मग काही वेळानन्तर सरु ने अरुलच्या खांद्यावर डोकं ठेवलं आणि हाथ पकडून बोलली...*

*“शोना Love uhh so much... love uhh love uhh love hhhh... मला कधीच सोडून जाऊ नकोस”....*

आधीचे दिवस आठवून सरुच्या डोळयात पाणी आलं... सरु मनातल्या मनात बोलली...

“अरुल sorry... शोना sorry पण मी काय करू मला नाही काय कळत.... बाबा कधी ऐकणार नाही आणि मी त्यांच्यापुढे नाही जाऊ शकत तू मला नेहमी समजून घेतो या वेळी पण समजून घे”...

सरु रात्र भर विचार करत बसली... सकाळ झाली सरु collegeसाठी निघाली... जाताना अरुलच्या घराकडे पाहू लागली पण तिला अरुल दिसला नाही... आधीच सरु चा मन उदास होता व अरुल दिसला नही म्हणून सरु अजून उदास झाली... खाली मान टाकून सरु निगुण गेली... college ला पण मन लागत नव्हता... कसं तरी वाटत होता सरु ला... आज काय वेगळीच दिसत होती सरु अत्यंत शांत उदास... सरुच्या चेह्ऱ्यावरून कळत होतं कि, ती रात्र भर झोपली नाहीये... सरु ची मैत्रीण पूजा सरु ला विचारू लागली...

“सरु काय झालाय ठीक आहेस ना... काय तरी बोल”....

“सरु बोलली नाही मी ठीक नाहीये मला अरुल ला भेटावंसं वाटतंय मी नाही राहू शकत त्याच्याशिवाय... मी काय बोलली त्याला काल असं कसं मी त्याला सोडू शकते माझ्यावर किती भरोसा केलं त्याने आणि मी एव्हढं सगळं बोलली त्याला. आणि तो मला काहीच नाय बोलला. अगदी शांत उभा होता. मला त्याचा जवळ जायचं आहे त्याला मितीत्त घालून त्याला सांगायचं आहे कि मी कुठेच जाणार नाहीये, मी आहे सोबतच आहे माफ करून टाक मला Sorry..... पूजा मी खूप चुकीचं केलं ना”....

सरु खूप रडायला लागली... पूजा ने सरु ला जवळ घेतलं व तिला शांत केलं....

“सरु शांत हो. काय नाय होणार. होईल सगळं ठीक.... हे काय सरु relationship मध्ये असं होत असतं आणि अरुल समजूतदार आहे काळजी करू नको, आपण चल अरुल ला फोन करूया.... त्याने तुझा आवाज ऐकलं कि तो कुठेही असेल बघ धावत येईल.. चल phone लाव तू अरुल ला”....

“हाँ मी फोन लावते त्याला येईल तो”..... सरु ने स्वतःला शांत करत अरुल ला फोन लावला....

“Hello..., हां कोण बोलतंय अरुल झोपला आहे आज नाही येणार तो college ला”...

सरु ने हे ऐकताच call cut केलं... call  अरुलच्या आईने फोन उचला होता... सरु बोलली पूजा ला...

“अरुल आज नही येणार college ला... झोपला आहे तो अजून, काय झालं असेल यार त्याला एव्हढा वेळ झोपून नसतो तो कधी.. आज कसा काय एव्हढा वेळ झोपला आहे तो”....

“सरु काय नाय ग राणी. एवढा विचार करू नकोस... झोपला असेल. थोडं आराम करु देत त्याला, थोड्या वेळाने परत call  कर त्याला.... oook चल tension घेऊ नकोस, चल एक काम करूया मी डब्बा आणलाय खाऊया”...

“नाही पूजा. मला नकोय. भूक नाहीये. मला नाही खायचं”.....

सरु ने mobile काढला व सरु अरुल आणि स्वतःचे photos.. बघू लागली...

“बरं सोड शांत हो थोडं वेळ”... पूजा बोलली सरु ला...

काही वेळ नन्तर सरु चा फोन वाजला... बघतेय तर काय अरुल चा call सरु खुश झाली...

“पूजा अरुल चा कॉल आला”... “हो अग आधी phone उचल”...... “हां उचलते ना”..

सरु ने Call receive केला, व हळूच बोलली..... “Hello .... hello, समोरून काहीच आवाज ऐकायला येत नव्हतं... सरु उदास होऊन बोलली, ... शोना बोल ना काय झाला ठीक आहेस ना डोक दुखतंय का बरं वाटत नाहीये का बोल ना”...

तेव्हाच समोरून अरुल बोलला......

“haaaaa.... बोल कुठेसे तू”....

सरु बोलली “तू कुठे आहे सांग मला मी येते”

“मी college मध्ये आहे. तू कुठे आहे”...

“मी canteen मध्ये आहे”...

“थांब कुठे जाऊ नकोस. मी येतो तिथंच. थांब. आलोच”......

“हो थांबते... ये तू लवकर”....

अरुल canteen मध्ये आला... आणि त्याच्या पाठीच अश्या पण आला......

“अरे काय भावा आज एवढा उशीर केलास यायला... मी घरी आल्तो तुझ्या, आई बोलली झोपला आहेस”.....

“हो झोपलो होतो आणि ते डोकं पण दुखत होतं थोडं “.....

दोघे जण गप्पा मारत मस्ती करत होते... सरु त्यांना लांबून पाहत होती... अरुल ला हसताना बघत सरुही जरा खुश झाली... सरु पूजा ला बोलली “आला अरुल मी येते.” पूजा बोलली “हो ये”... सरु जाग्यावरून उठली आणि अरुल जवळ येऊन थांबली...... सरु ला बघून अश्या बोलला...

“सरु आली बघ”....

अरुल बोलला “हो चल चहा पिऊया”....

सरु लगेच बोलली अरुल ला... “Oye hero काय बघितला नाही का मला”....

“हो शोना बघितलं ना चल चहा पिऊया”....

अरुल सरु चा हाथ पकडून तिला सोबतीनं घेऊन आला, अरुल अश्या... सरु आणि पूजा चौघे मस्त चहा पित गप्पा मारू लागले, सरु चा पूर्ण लक्ष अरुलवर होता.... अरुल काल जे काही झाला त्यावर काहीच बोलत नव्हता, सरु ला कसंतरीच होत होतं... काही वेळ नन्तर सरु अरुल ला बोलली...

“चल ना बाहेर फिरून येऊया”....

अरुल बोलला.... “ठीक आहे चल जाऊया”.....

अश्या आणि पूजा ला bye करून अरुल आणि सरु दोघे collegeच्या बाहेर निघून आले, college बाहेर आल्यावर अरुल थांबला... आणि सरु ला विचारलं बोल.....

"कुठे जायचा".....

सरु बोलली..... "चल Collegeच्या पाठच्या रोड ला"... बरं चल म्हणत अरुल चालू लागला, अरुल पुढे पुढे चालत होता. सरु बोलली...

"अरे बापरे इतकी घाई"...... सरु ने अरुल चा हाथ पकडला व अरुल ला बोलली....

"शोना sorry ना शोना, बघ ना इथं sorry शोना... बोल ना काय तरी शांत राहु नकोस ना"....

अरुल ने हळूच सरुकडे बघितलं व बोलला... "शोना शांत हो relax हो काय नाही झालाय... oook, tension घेऊ नकोस"...

अरुल आणि सरु collegeच्या पाठी येऊन बसले अरुल ने सरु चा हाथ पकडला तिला मितीत्त घेतला व बोला......

"Love uhhhh so much shona.... जे झालं ते विसरून जा, पण लक्षात ठेव पुन्हा कधी असं बोलू नकोस कि विसरून जा... नाही आवडत शोना कसं तरी वाट असं imagine करायला पण नाही आवडत भित्ति वाटते शोना असं कधीच होऊ शकत नाही, मी तुला नाही वसिरु शकत.... सरु "

“हो शोना या पुढे कधीच नाही बोलणार असं promise, sorry शोना माहित आहे मला मी तुला खूप hurt केला, मी नाही सोडणार तुला कधीच नाही आणि तुही कुठे नाही जाणार आहेस “...

सरु चा मन भरून आलं हृदयात जे काय कुठे एका कोपऱ्यात लपून ठेवलं होता आज ते सरु ने अरुल समोर व्यक्त केलं, सरु ने अरुल चा हाथ घट पकडला आणि खांदयावर डोकं ठेवून दोघं शांत होऊन एक मेकात गुंतून गेले.....

अरुल बोलला सरु ला.... “शोना ऐक लक्ष देऊन मी काय बोलतो”....

सरु बोली.... “हा शोना बोलना ऐकते मी”.....

“माझ्याकडे बघ आधी इथं, इथं बघ”....

सरु ने मान वर केली व अरुलकडे बघून बोलली.... “बरं बोल काय बोलतोय शोना”...

“सरु ऐक! कधी पण काय पण असेल, काय पण झाला तर मला सांग share कर पण स्वतः frustrate होऊन रडू नकोस घाई गडबडमध्ये, काहीही चुकीचं निर्णय घेऊ नकोस. रागात आपण नेहमी चुकीचा विचार करतो.... बघ relationship आहे .भांडण वगैरे होत राहतात. आणि हे तर सुरुवात आहे. अजून या पुढे भरपूर अशी वेळ येईल, भरपूर असे किस्से होतील, तू काय मग प्रत्येक वेळी असं वागशील का? break up solution नसतो शोना, शोना parents आहे आपले, आणि कोणतेही parents Directly थोडं असं permission देतील आपल्या मुलीला? कि जा बाबा हवं ते कर फिर ज्याच्यासोबत हवं त्याच्यासोबत, काळजी आहे त्यांना तूझी म्हणून ओरडतात ना शोना, आपण प्रयत्न करू ना शोना

मी आहे ना मी successfull बनेन मग आपण करू आपल्या parents ला convince बघ शोना एवढंच कि या पुढे असं काय extreme नाही झालं पाहिजेल”.....

सरु ने अगदी शांतपणे ऐकलं सगळं आणि अगदी स्वाभाविकपणे उत्तर दिलं..... “हो शोना नाही होणार, शोना घरून खूप torture आहे काय करू मला नाही काय कळत... तुला माहित आहे कोण बोलत पण नाही माझ्यासोबत, त्यावर ते काका ज्यांनी आपल्याला बघितलं होतं ते तर बाबांना बोलत होते कि लग्न करून टाका सरुचं... मला तर काहीच समजत नाही कि मी काय करू आणि शोना कोणच बोलत नाही आई पण बाबा पण... मला नाही आवडत तस शोना काय करू मी... मलाच नाही कळत काय...” हे सगळं सांगताना सरुच्या डोळयात पाणी आलं...

अरुल ने सरु ला जवळ घेतलं व तिचे डोळे पुसले आणि तिला मिठीत घेतलं, तिला शांत केलं...

“शांत हो शोना चल मी आहे ना मग काय tension घेते तू, तू पण ना येडी चल हस... smile ना शोना”....

सरु ने अरुलकडे बघितलं आणि प्रेमाने गालातल्या गालात हसली... प्रेमाने अरुल चा हाथ पकडून बोलली... “love uhh so much”.......

सरु बोलली.. “चल शोना निघायचं का... 6 वाजत आले परत नाहीतर घरी कळलं तर वाट लागेल”...

अरुल बोलला “हो शोना चालेल चल निघूया”.....

दोघं एक मेकांना bye करून घरी निघून आले.... संध्याकाळी सरू चा call  किवा message काय नाही आलं... अरुल ने विचार केलं घरी सगळे असतील म्हणून नसेल केला...

सकाळी दोघं college मध्ये भेटले.... अणि रोज असेच कॉलेजमध्येच भेटू लागले सरु आणि अरुल ने ठरवलं कि काहीही risk न घेता अपूण college मधेच भेटत जाऊया... आता life चांगली चालू होती... saga मस्त चालू होतं...

सगळं चांगलं चालू होतं. अरुल आणि सरु रोज college मध्ये भेटायचे... व खूप जपून रहायचे, एकदा जे झाला ते परत तसला काय झाला नाही पाहिजेल यासाठी दोघं खूप काळजी घ्यायचे... मधी मधी जेव्हा मन नाही लागायचा college ला तेव्हा, दोघं जण बाहेरही जायचे फिरायला, पण अगदी सगळं plan करून ठरवून... खूप मस्त चालू होतं दोघांचं कधी movie ला, तर कधी marine drives ला... कधी गार्डनमध्ये बसून गप्पा मारत बसायचे तर कधी संधी मिळाली तर फोनवर बोलत बसायचे.... असंच करत college चे 3 वर्ष निघून गेले.. व परीक्षेची वेळ आली... आज काय अरुलच मन लागत नव्हतं college मध्ये, त्याने सरू ला विचरल....

“चल न शोना movie ला जाउया”...

सरू ने नकार दिला..... “पागल आहे का गप exams आलेत मला अभ्यास करायचा आहे मी नाय नन्तर कधी तरी जाऊ”...

“शोना चल न जाउया ना. एक्झाम खुप अंतर आहे चल न आज जाउया असं काय करतेस”....

“नाहीं हट्ट करू नकोस तुला काय वाटतं की नाही exams आलेत अणि तुला Movie  ला जायचा आहे आपलं last year आहे अभ्यास करायचा आहे मला”......

“अणि मला, मला नाही का करायचा अभ्यास तू असं का बोलतेस, Exams माझे पण आहे ना मी तर एवढंच बोलतोय की exams आधी थोडा chill करूया”...

“नाही तुझा chill  तुझ्याकडेच राहुदे.. मला नाही यायचं बस्स”...

“शोना चिड़तेस का पण तू... movie ला तर जायचा सांगतोय अजून काय”...

“मी नाही चिडत आहे मी फ़क्त एवढं बोलते की मला नाही यायचं बस्स”...

“अरे ऐक न असा काय करतेस... नेहमी असं करतेस तू”.....

“नेहमी म्हणजे इतर वेळी कधी नाही का येत मी... घरी खोटं बोलून तुझ्यासाठी college bunk करून येते ना मी”...

“तुझ्यासाठी म्हणजे तुला नसतं का यायचं फ़क्त मी बोलतो म्हणून येते का”... अरुल खूप चिडून सरु ला विचारू लागला

“हो तू बोलतो म्हणून येते मी फ़क्त”... सरु ने अगदी रागात उत्तर दिला

“ठीक आहे... चालेल जा college ला”...

“ठीक आहे काय, बोल”.....

“काय नाय चल सोड topic जा college ला”...

“अणि तू, तू पण चल न सोबत एकत्र अभ्यास करूया ना”.....

“हो शोना ठीक आहे चल मी पण येतो चल”...

सरु ने अरुल चा हाथ पकडलं आणि अशीच हलकी फुलकी नोक झोक करत दोघे.... college मधे आले आणि एकत्र library मध्ये बसून अभ्यास करू लागले..... बघता बघता exams शुरू झाले न आज शेवट चा दिवस होता exam चा. paper संपल्या नन्तर सगळे एक मेकाना Bye करत होते, परत भेटूया कधी तरी असं promise  करत होते... तसेच ईथे अश्या पूजा अरुल अणि सरू एका बाजूला थाम्बुन शरबत पीत होते व... college चा आपआपला experience share करत होते... तेव्हाच सरू बोलली...

“यार result चा टेंशन आहे मी पास होईल ना”.....

पूजा बोलली.... “गप ग रानी एक तर तू scholar आहेस उगाच आम्हाला tension देऊ नकोस... ईथे आता कुठे तरी tension free झालीय मी न तू त्यात”...

पूजाचं असं बोलणं ऐकून सगळे जोर जोरात हसू लागले... व त्यांची अशीच गमत चालू होती... मग थोडा वेळ नन्तर सगळे आप आपल्या रास्त्या ला निघाले...

अरुल अणि सरू एकत्र घट एक मेकांचा हाथ पकडून चालत होते...

“उदया तू गावाला निघून जाशील ना, मग १ महिन्या नन्तर येशील पूर्ण १ महिना कसं जाईल यार, म्हणून मला सुट्टी छे दिवस नाही आवडतं”... अरुल थोडं चिडूनच बोलला

सरू ने अरुल कड़े बघितला अणि बोलली.... “शोना ते तर ठीक आहे पण तुला माहित आहे ना.... मी कधी येतेय गाँव वरुन १ तारखे ला”...

“माझा birthday मी किती सांगितलं बाबा ना पण ऐकतच नाही हड यार” ..... सरु असं म्हणत चिडु लागली अरुलवर...

“हो शोना माहित आहे आल्यावर करूया न तुझ birthday celebrate तू Tension का घेते... शांत शांत हो माझी शोना”....

“नाहीं पण मला तुझा सोबत birthdayच्या दिवशी रायचं होतं ना”..... असं म्हणत सरू अरुल ला मारू लागली... व मग रडू लागली... माझा birthday”....

अरुल बोलला.... “अरे पागल माझी शोना... sweet shona माझी angel, माझी शोना चे डोले किती छान किती सुन्दर आहे अणि शोना रडते, हे बघ शोना मान्य करतो कि रडताना तू एकदम भारी, कचको, रावस डिसतेस full ठवका... मग काय तू रडत बसशील का”....

सरू बोलली “हो का”... “हो न शोना खरंच चल रडणं बंद कर”....

“हो नाही रडत शोना”......

सरु ने अरुल ला मितीत्त घेतलं... अणि सरू बोलली....

“बरं ऐक शोना या वेळी Call  वर बोलायला भेटेन की नाही माहित नाय... बाबा खुप ओरडतात, की काय सारखा सारखा phone वर असते अणि गावी सगळे असतील काका वगेरे मग नाही जमनार मग तू mood Oooof नकोस”.....

“हो शोना नाही करत...., pakka नाही करणार”...... ummmmm “तसही तुला सांगितलं ना मी उद्यापासून मी job ला जातोय night shift आहे”...

“हो शोना सांगितलं... शोना थकशील ना आराम पण नाही भेटणार तुला”.....

“हो शोना पण ठीक आहे.... कसं आहे कि आज मी मेहनत करनार मग एक दिवस जेव्हा future मध्ये मी succesfull होईन तेव्हा मग तुला सांगता येईन ना बाबांना कि नाही तो चांगला आहे succesfull आहे... मग काय मेहनत तर करावी लागणार ना... शोना”

“हो शोना”... थोडं वेळ शांत होऊन सरु अरुलकडे पाहू लागली... आणि मग लांब स्वाश घेऊन हळूच बोली.... love uhh so much अरुल”.....

“Love uhhh too सरु”.......

दोघेही आता घरी निघून आले... सरु खूप खुश होती आणि अरुल पण खूप खुश होता, आता थोडे दिवस भेटायला नाही जमणार त्याचा मनात दुःखं तर होतं पण तरी दोघं खूप खुश होते...

संध्याकाळच्या bus ने सरु गावी निघून गेली... जायाचं वेळी सरु ने अरुल ला call लावला.....

“Hello शोना जातेय मी, काळजी घे आणि तू नीट वेळेवर खाऊन घे जास्त उशीर करू नकोस, काम नन्तर आधी जेवण आणि मी येतेच लवकरच”....

“हो सरु तू कुठे जातेय माझा सोबत आहेस तू माझा जवळ”...

“हो शोना मग काय सवाल आहेच मी बरं चल मी ठेवते फोन”...

“हो ठेव काळजी घे शोना Love uhhh”.....

“Haaaan”.... सरु ने call cut केलं

अरुल ने रात्री सरु ला good night message केला.. व अरुल झोपला गावी range नाही म्हणून सरु ऑनलाइन नव्हती.....

आजपासून अरुल जॉब ला join झाला night shift ला... दिवस भर सरु चा काय call  नाही न message पण तरी अरुल खूप खुश होता... जॉब पण चांगला भेटलाय सगळे नवीन freinds अरुल खरंच खूप खुश होता... पण तरी मनाच्या कोणत्यातरी कोपऱ्यात सरु ची आठवण होती....

अरुल रोज सरु ला good night, good morning message करायचा आणि अधी मधी नुसतच call करायचा वेळ भेटला कि आणि सरुही जमलं कि call वर बोलायची.... अरुल call करून सरु सोबत दिवस भर कामावर जे काय केलं दिवस कसा गेलं सगळं सांगत बसायचा..... दिवस असेच निघत गेले.........

आज सरु गावरून येणार होती... नेमकं ४ दिवसपासून सरु सोबत बोलणं काय झालं नव्हता त्यात birthdayच्या दिवसीही काय बोलणं झालं नव्हतं.... पण तरी आज मात्र एव्हड्या दिवस नंतर सरु सोबत भेट होईल हे विचार करून अरुल खूप खुश होता...

अरुल ने जंगी तयारी करून ठेवली होती birthday चा cake व गिफ्टही घेऊन ठेवला होता....

अरुल आणि सरु चे सगळे मित्र, मैत्रीण जमले होते सरु ची वाट बघत... तेव्हाच सरु चा call आला...

“शोना कुठे आहेस तू आज भेटायचं ठरलं होता ना मी निघाली आहे कुठे येऊ”.....

अरुल बोलला.... “college जवळ ये शोना”...

“हो शोना येते”...

काही वेळ नन्तर सरु आली व सगळयांना बघून surprise झाली, जशी सरु आली सगळे freinds सरु ला wish करू लागले... व अरुल ने येऊन सरु चा हाथ पकडलं... व तिला cake जवळ घेऊन आला सरु ने cake कापला... अरुल ला भरवलं मग अरुल ने सरु ला गिफ्ट दिलं... अरुल ने गिफ्टमध्ये सरु ला wrist watch दिली व बघून सरु ते खूप खुश झाली.... freinds सोबत enjoy आणि party करून... मग अरुल सरु ला गार्डनमध्ये घेऊन आला... दोघं तिथं बसून बस एकमेकांकडे बघत होते...

अरुलने सरु चा हाथ पकडला... व लांब स्वाश घेत बोलला....”hasshhh शोना खूप छान दिसतेस... आज तुला इतक्या दिवस नन्तर बघून खूप खुश आहे मी... असं वाटतंय कि बस्स बघत बसू तुला कितीही बघितलं तरी मन काय भरतच नाही खूप मस्त वाटय.... एक दम कचको”...

सरु बोलली...... “हो शोना मलाही खूप मस्त वाटय”...

सगळं चांगलंच चालू होतं डोघ जण मस्त एक मेकांमध्ये रमून गेलते.... खूप दिवस नन्तर भेटले होते बस्स डोघ एक मेकांना बघत बसले होते... जणो ते नाही त्यांचे डोळे एक मेकसोबत बोलताय.... अरुल सरु ला एकटक बघत होता... व बोलला “अर्ज किया है”.....

सरु बोलली.... “wahhhh... मस्त किती दिवस झाले एक पण शायरी नाही ऐकली तुझी मस्त.... इर्शाद इर्शाद”

“अर्ज किया हैं”....

“श्वेत श्वेत हसी तुझी... धुंद धुंद छाया....

उन्हाळ्याची गर्मी तू... तू हिवाळ्याची छाया....

फुलून दिसे गाल जेव्हा होई लाल लाल....

लाजही तुझी जीव घेई माझा आज...

रोग हा बघ ना कसा मला झाला...

राग पण तुझा लागे या मनाला प्यारा...

करूनही तुझा या मनात वास...

हृदयात कुठे तरी  ठेवू लपून तुला आज”...

अरुल आणि सरु असंच प्रेमाने बोलत होते कि तेव्हाच सरु चा भाऊ म्हणजेच तिचा काका चा मुलगा त्याने सरु ला अरुल सोबत बघितलं... तो लगेच त्याचा मित्रांना सोबत घेऊन सरु आणि अरुल जवळ आला दादा ला समोर बघून सरु तर इतकी घाबरलि कि लगेच रडायला लागली... व अरुलच्या मागे लपली... सरु चा भाऊ... निलेश येऊन सरु ला अगदी रागात बोलला....

“इथं काय करतेस चल घरी निघ”...

अरुल हळूच सरु ला बोलला.... “सरु जा तू... जा सरु”

तेव्हाच निलेश ओरडून बोलला सरुला.... “ऐलकलं नाहीस का निघ बोललो ना तुला निघ इथुन”.....

सरु खाली मान टाकत निघून गेली तिथून...

निलेश बोलला अरुल ला..... “काय रे लय माज आलाय का तुला, माझ्रा बहीणच्या पाठी, साल्या कुत्र्या तुझ्रा घरी येऊन सांगितलं होता ना काका ने समजलं नाही का तुला म”.....

अरुल ने अगदी शांतपणे उत्तर दिला... “सरु मला आवडते आणि मला... ?.

इतका ऐकताच निलेश ने अरुलवर हमला केला.. व त्याचे मित्र पण सगळे सोबत एकत्र मिळून अरुल ला एकट्याला मारू लागले... अरुल ला इतका मारला कि तो रक्ताने भरला... व हे सगळे पोर अरुलला असंच सोडून निघून गेले..... अरुलला डोक्यावर मार लागलं होता व रक्त निघत होतं, अरुलला डोक्यावर लागल्या मुले तो बेशुद्ध पडला तिथंच..... हे सगळं होताना अरुलच्या एका मित्राने बघितलं व त्याने अश्याला बोलवून आणलं... अश्या धावत आला व अरुलला हॉस्पिटलला घेऊन आला... अरुल बेशुद होता डोक्यावर मार लागला होता अगदी टाके बसले त्याला...

अरुलला admit केलं... अरुल चे आई बाबा हॉस्पिटलमध्ये आले... आई तर खूप रडत होती अरुलला असं बघून.. पोलीस complaint हि झाली पण अरुल ने शुद्ध आल्यावर पोलिसांना सांगितलं कि माझ्रा accident झाला ... मला कोणी मारला वगैरे नाही... व अरुलच्या ह्याच बोलण्यावर case close झाला... अश्या

अरुलवर खूप चिडला त्याने नेमकं जे खरा होतं ते का नाही सांगितलं पोलिसांना यावर अरुलला खूप सुनावलंही अश्या ने....

अरुल चे बाबानी अरुल चा हाथ पकडला... व अरुलला बोलले....

“बाळा तू माझा एकूलता एक मुलगा आहेस असं काही करू नकोस कि या वयात मला झेपणार नाही... मी तुला असं इथं या हालतमध्ये नाही बघू शकत... सरु चे आई बाबा नाही ऐकणार विसरून जा तिला”... अरुल चे बाबा अगदी उदास होऊन अरुल ना नीट प्रेमाने समजवत होते...

अरुल बोलला.... “बाबा मी तिच्याशिवाय राहवून घेईन पण ह्या अफसोस सोबत नाही राहू शकणार कि मी माझा प्रेम मिळवण्यासाठी नुसतंच प्रयत्नही नाही केलं.... मला माझासाठी एक प्रयत्न करू द्या please”...

तेव्हा आई बोलली.... “कि हां तू कर प्रयत्न कर तू, ती तर तिथं खुश आहे आणि तू बघ इथं काय हालत झालीय तुझी”...

“नाही आई ती पण खुश नसेल...... आई होईल सगळं ठीक सगळं ठीक होईल”.....

अरुल शांत बसला... अश्या हे सगळं ऐकून हॉस्पिटल बाहेर निघून आला... तेव्हा अश्या ने बघितला कि सरु तिथं येत होती चेहऱ्यावर ओढणी टाकली होती व लपत लपत येत होती... अश्या ने सरुला ओळखला... व तिच्या जवळ गेला... व तिला बाजूला घेऊन आला.....

“कुठे चाललीय आत अरुल चे आई बाबा आहे आत बसले त्याचा सोबत”...

“मला अरुलला बघायचं आहे” म्हणत सरु रडू लागली.....

सरुला रडताना बघून अश्या बोलला.... “आता का रडतेस आधी बघ जरा काय हालत झालीय अरुलची. चांगला होता माझा मित्र. पण काय बोलू,  तुझ्या भावाला समजून ठेव आणि समजवू नकोस जपून ठेव आता त्याला, जीथं भेटला तो खपला समज सोडणार नाही मी त्याला, एक तर अरुलला बरं होऊ देत मग बघ तू काय करतो आम्ही”....

अश्या चं असं बोलणं ऐकून सरु खूप रडत होती आणि एक हट्ट पकडून बसली होती कि.... “मला अरुलला बघायचं आहे”....

अश्या शांत झाला व बोलला.... “चल माझा सोबत”...

अश्या सरुला हॉस्पिटलच्या मागे घेऊन आला व सरु ने तिथून अरुलला खिडकी मधून बघितलं अरुल झोपला होता अरुलला असं बघून सरु खुप रडली डोक्यावर पट्टी व अरुल ची अशी हालत बघून सरु तिथून धावत निघून गेली अश्याने तिला थांबवायचा प्रयत्न केलं पण सरु थांबली नही....

प्रेम... मात्र प्रेम माणसाला काय च काय बनवून टाकतं एक प्रेम कि माणसाला काबिल बनवतं तर तेच प्रेम  माणसाला कमजोरही बनवतं..... प्रेमाला ज्याने समजलं त्याने जग जिंकला ज्यांनी प्रेमाला नाही समजलं त्यांना सर्वश्व भेटून पण त्यांची हार आहे...

अश्या ने हे जाऊन अरुलला सांगितलं कि सरु आलती... आई बाबा होते म्हणून आत नाही घेऊन आलो पण ती तुला बघून गेली खूप रडत होती... हे ऐकून अरुलला मनाला शांतता भेटली चेहऱ्यावर स्मित हसी फुटलि... व अरुल ने एक आतुरते सोबत अश्याला विचारलं कि....

“सरु ठीक आहे ना”...

“हो अरुल, सरु ठीक आहे, ती चेहऱ्यावर ओढणी बांधून लपून आलती घरच्यांकडून. गेली तुला बघून”.... अश्या बोलला अरुलला....

अरुलला आज हॉस्पिटल मधून सुट्टी भेटली आई बाबा व अश्या सोबत घरी आले... अरुल ने अश्याला सांगितलं.....

“भावा बघ ना जरा सरु कुठे आहे कशी आहे घरच्यांन मुळे तर तिची हालत झाली असेल... काय तरी खबर काढून आण ना तिची भाई”....

अश्या बोला..... “हो बघतो मी”...

अश्या गेला व काही वेळ नंतर परत आला... अश्याच्या चेहरा वरून हे स्पष्ट दिसत होतं कि खबर चांगली नाहीये व त्याची अरुललाही खात्री होती... पन जे अरुल ने ऐकलं ते मात्र असं होईल त्याची अरुलला ठाऊक नव्हती....

अश्या ने सांगितलं अरुल...... “सरुला बगायला मुलगा आलता घरी, तिच्या घरचे स्थळ शोधताय तिच्यासाठी आणि मला पूजाकडून हे कळलं कि तिला कोण विचारणार नाही कि तिला मुलगा आवडतो कि नाही बस त्याच मूला सोबत तिचे लग्न ठरवणार आहेत घरचे”......

हे ऐकून अरुलच्या पायाखालची जमीन हलली... अरुलच्या मनाला धक्का बसला, अगदी शांत रहाणारा अरुल आज मात्र पहिल्यांदा रागात होता... इतका कि राग त्याचा चेहऱ्यावर स्पष्ट दिसून येत होता व अरुल अश्याला बोलला अश्या चल......

अश्या आणि अरुल दोघेही रागात होते अरुल ने ठरवलं कि पूजाकडे जाऊन मात्र एकदा कसंहि करून सरु सोबत बोलायचं प्रयत्न करूया... तेव्हाच रस्त्यात अरुलला निलेश भेटला... तो त्याचा मित्रांसोबत बसला होता व... अश्या

ची नजर जशी निलेशवर पडली तो तर रागात काळा निळा झाला... अश्या अरुलला बोलला......

'अरुल हा बघ कुत्रा, बोल फक्त. इतच कापून टाकूया ह्याला"......

अरुल बोलला.... "अश्या गप चल सध्या काय नाही करायचं, सध्या मला सरु सोबत बोलायचं आहे"......

अरुल पुढे जाऊ लागला... तेव्हा निलेश जागेवरून उठला व बोलला...

"ए भिकाऱ्या बहिणीचं लग्न ठरलाय व्हय, ये हां का लग्नात मोफतमध्ये जेवण पण करून जा"... निलेश अशी अरुल ची खिल्ली उडवत बोलला व या निलेश चे मित्र सगळे अरुलवर हसू लागले...

अश्या हे ऐकताच वळून निलेशच्या जवळ येऊन बोलला....... "ए बस्स झाला हां गप बस्लोय तर जास्त शांनपणा करू नकोस"...

"अरे बापरे घाबरलो हां मी, अबे ए अरुल समजवं आपल्या लाडक्या मित्राला... नाहीतर जशी तुझी हालत केलती ना त्यापेक्षा बेकार हालत ह्याची होईल समजव ह्याला"..... निलेश अगदी रागात बोलला

हे ऐकून अश्या भडकला पण अरुल बोलला अश्या थांब शांत हो.... अश्याला बाजूला करून अरुल निलेश जवळ गेला... व अगदी त्याचा समोर थांबून त्याचा डोळ्यात डोळे टाकून एकदम शांतपणे बोलला...

"लग्नाचा आमंत्रण दिल्या बदल धन्यवाद....लग्नात तर येणार मी पण लक्षात ठेव, लग्नात येणार पण व नवरीला घेऊन पण जाणार मी तेही सगळयांसमोर आणि तुला हवं ते कर, राहिली गोष्ट जेवण्याची ते तर मी खाऊन जाणार

सासरवाडी ची नाहीतर काय इजत रहाणार कि जावई जेवल्याशिवाय निघून गेला"....

हे ऐकताच निलेश ने अरुलवर हाथ उचला पण अरुल ने हाथ अडवत त्याचा हाथ धरला व हाथ झटकत निलेशचा थोबाड पकडून बोलला...

"माझ्या होणाऱ्या मेव्हणा जेवढी इजत देतोय ना तेवढं इजतमध्ये रहा... नाहीतर तुझ थोबाड मला काय खास आवडत नाही.... तुझा बहिणी मुळे गप आहे मी.  नाहीतर औकात काय आहे माझी आणि लायकी काय आहे तुझी ह्याची जाणीव तुला आताच झाली असती".... रागात असा म्हणत अरुल ने निलेशला ढकलं व बोलला.... "येतो जरा नीट काळजी घ्या अजून लग्नाची तयारी करायची आहे.... आणि ए फुकट्यांनो तुम्हीच आपल्या ताईच्या लग्नाला यायचा हां"..... अरुल असं निलेश व त्याच्या मित्रांना अगदी रागात बोलला आणि पुढे निघून आला....

व अश्या निलेशला बोलला..... "काय राव उतरली का हेकडी"...

हे ऐकतच निलेश आणि त्याच मित्रांनी खाली मान टाकली... व अश्या अरुलच्या पाठी निघून आला...

निलेश आणि त्याचे मित्र तिथंच थांबून होते... अरुल चं असं बोलणं ऐकून निलेश ने काय नाही केलं व निलेश ची हिम्मत तुटली अरुल समोर...

अरुल आणि अश्या पूजाच्या घरी पोचले... तिच्या घरी कोण नव्हत.... पूजा ने दोघांना आत बोलावलं... आणि बसवलं... पूजाने अरुलला सांगितलं कि.......

"अरुल तिची हालत खूप खराब आहे मी तिच्या घरी गेलती तिचे बाबा नव्हते म्हणून मला तिच्या सोबत बोलायला भेटलं व एवढा सगळं कळलं नाही तर काहीच समजलं नसतं.... अरुल काय तरी कर नाहीतर तुझी सरु"...

“पूजा काय नाय होणार फक्त एक काम कर माझा सरु सोबत माझं बोलणं होईल असं काय तरी कर”...

“हे कसं शक्य आहे आता... ह्या situation मध्ये”....

अश्या बोलला..... “सध्या situation नवे पण दोघे एक कसे होतील ते बघ”...

हे ऐकून पूजा बोलली.... “थांब मी प्रयत्न करते”.....

पूजा ने सरुच्या घरी तिच्या आईला कॉल लावला......

“Hello काकी ऐकाना मी पूजा बोलते, काकी घरी कोण नाहीये आई आणि बाबा बाहेर गेलेत मग थोडं वेळ सरुला पाठवता का इथं”...

“नाही. ती नाही येणार आता, हवं तर तू ये इथं जेवण वगैरं करून जा”...

“बरं ठीक आहे काकु”... पूजा ने फोन ठेवला....

पूजा बोलली.... “अरुल नाही काकू नाही पाठवत तिला... उलटं ते तर मला तिथं बोलवताय”...

“बरं ठीक आहे, ..... पूजा एक काम कर माझं, तूच जा तिथं मी तुला एक पत्र लिहून देतो ते तिला दे”.....

“बरं ठीक आहे जाते मी”...

अरुल ने पूजाच्या हाथी सरुसाठी पत्र पाठवलं ......

*“सरु.... माझी शोना घाबरू नकोस मी आहेना सोबत तू ठीक आहेस ना, नाहीयेस ना ठीक माहित आहे पण थोडे दिवस शोना मग सगळं ठीक होईल माझ्यावर भरोसा ठेव शोना तू काळजी करू नकोस मी आहे नेहमी तुझा सोबत तुझा जवळ, काय नाय होणार शोना बस्स हिमत हारू नकोस, तुझे बाबा पण ऐकतील आणि होईल सगळं ठीक आपल्याला लांब कोण नाही करणार माझा promise आहे तुला शोना.... love uhhh सो much शोना”......*

हे पत्र वाचून सरुच्या डोळयातून पाणी आला... आणि सरु पूजाला चिपकून खूप रडली.....

“पूजा सांग ना ग काय करू मी कोणाचा ऐकू कोणाला समजवू, कोणाला मनऊ मी, आई बाबाची बाजू घेतली तर प्रेमाचा विश्वास तुटेल आणि प्रेमची बाजू घेतली तर आई बाबाचा विश्वास तुटेल, बोल ना तूच काय करू मी... कोणाला सांगू सगळे माझेच आहे यार प्रेमालाही नाही गमवायचं मला आणि आई बाबाला पण काय करू काय कळत नाही..... मी अरुलला भरोसा दिला आणि आता हे सगळं काय होतंय काय कळत नाहीये मला”.......

“ऐक जास्त विचार करू नकोस सध्या थोडं डोकं थंड ठेवून विचार कर कि तुला काय करायचं आहे जे तुझ्या मनाला वाटेल कि बरोबर आहे तेच कर”...... पूजा ने सरुला खूप समजवलं....

"पूजा अरुल कसा आहे ठीक आहे ना... आता त्याची तबेत कशी आहे ठीक आहे ना तो".....

"हो ग राणी तो ठीक आहे काळजी करू नकोस"...

तितक्यात सरु चे बाबा आले... व पूजा तिथून निघून आली.... अरुल पूजा ची वाट बघत थांबला... होता जशी पूजा आली...  अरुल ने एकदम प्रश्नांची बरसात केली...

"काय झाला कशी आहे सरु ठीक आहे ना काय बोलली सरु रडत होती ना ती येडी सांग ना पूजा काय बोलली सरु"...

पूजा ने विस्तार पूर्वक जे काय घडलं ते अरुलला नीट समजवून सांगितलं व पूजा बोलली...... "बघ अरुल आता तुझवर सगळं depend आहे कि तुला काय करायचा आहे".... आणि पूजा तिथून निघून गेली...

अश्या बोलला.... "काय करायचा आहे म्हणजे अरुल जास्त विचार करू नको, भेंडी त्या टाकल्याला काय घाबरायचं सरुला पळून आनुया अपूण, अरे मी आहे ना"..... अश्या असं बोलत रहायला व अरुल हे सगळं काय ऐकतच नव्हता आपल्याच विचारात गुंतला होता तो..... अरुल काय न बोलता तिथून जाऊ लागला... अश्या त्याला थांबवतोय पण तो काय थांबत नाहीये...  अरुल तिथून निघून आला....

अरुल आणि अश्या दोघं कट्यावर येऊन बसले होते..... तेव्हा अश्या ने बघितलं कि सरु चे बाबा जात होते, अश्या बोलला......

"अरुल ते बघ सरु चे बाबा चायला या डोकऱ्या मुळेच सगळं होतंय याला मी सोडणार नाही"..... अश्या खूप रागात बोला....

अरुल बोलला..... "हो भेंडी थांब मी बघतो"... म्हणत अरुल आणि अश्या सरुच्या बाबांचा पाठलाग करू लागले... पाठलाग करत ते लोक थेट एक सामसूम रस्त्यावर आले... तेव्हा अरुल ने सरुच्या बाबाला थांबवलं...

"ओ काका... थांबता का जरा".... सरुच्या बाबांनी वळून बघितलं अरुल हाक मारतोय... ते थांबले व रागात विचारलं "काय रे काय झालं"...

अरुल बोलला..... "थोडं बोलायचं आहे तुमचा सोबत".....

"काय बोलायचं आहे आता तुला".....

"काका तुम्ही सरु चं लग्न ठरावताय असं कळलं मला...... तुम्ही सरु चे बाबा आहेत तिचासाठी जे काय ठरवणार चांगलंच ठरवणार मुलगा पण चांगला शोधला असेल तुम्ही.... आज भले सरु खुश नाही पण पुढे जाऊन ती खुश रहाणार... माझी पण तीच इच्छा आहे कि तू खुश रहावी".......

"काका माझा सरुवर खूप प्रेम आहे मीही तिला खूप खुश ठेवणार मला एक मौका द्या फक्त सरुला खूप चांगला ठेवणार तुम्ही बोला काय करू मी, मी जातोय कामाला चांगला शिकलोय... तिला खुश ठेवेन बस सरु सोबत लग्न होऊद्या माझे... तुमचे हाथ जोडतो, हाथ जोडतो काका ... तिला सोडून मी नाही राहू शकत... एकूनती एक मुलगी आहे तुमची असं का करता तिचा मर्जी ने हौउद्या ना"......

सरुच्या बाबांनी सगळं ऐकून घेतलं व रागात अरुलला उत्तर दिलं..... "निर्लज कुटल्या, मला शिकवू नकोस कि मी काय केलं पाहिजेल... माझा समोर कितीही बोल काय नाही होणार आणि  या पुढे जर सरु चा नाव कधी तोंडावर आलं

तर जीव घेईन तुझा, कळलं ना माझी मुलगी आहे मी काय पण करेंन... चल हट्ट".....

अरुल त्यांना हाथ जोडत होता.... "काका please ऐका मी खरंच खूप खुश ठेवेन तिला ऐका ना काका"... पण सरु चे बाबा काय ऐकत नव्हते अरुल गुडग्यांवर बसून हाथ जोडत बोलत होता पण तरी सरु चे बाबा काय ऐकत नव्हते... अश्या ने अरुलला उभं केलं... अरुल च एवढं बोलणं ऐकून पण सरु चे बाबा काय ऐकत नव्हते व रागात बोलले.....

"माझ्या पोरी च लग्न मी तुझा सोबत नाही करणार नाहीच करणार जे करायचं आहे ते कर हव तर मारून टाक मला पण सरु चे लग्न मी तुझा सोबत नाही करणार, प्रेम वगैरे हे सगळे फालतू चे नखरे आणि धंदे असतात... आजकालच्या मुलांचं प्रेम भरपूर बघितलं मी कशे लोकांची पर्वा न करता आपल्या आई बाबांचा नाव घालवतात हर मला चांगलंच माहित आहे आणि तुझा काय म्हणं आहे कि माझ्याच पोरीचं आयुष्य बरबाद करू तुझासोबत लग्न करून टाकू कसं ठेवशील तिला किती कमावतो तू माहित आहे मला बोलली माझी मुलगी मला ती पण असंच समजवत होती मला काय माहित तू काय भरवलं आहे तिला कि ऐकत नाही माझी मुलगी किती गुणी किती हुशार होती पण तुझ्या पाठी पण नाय मी जे ठरवलं आहे तेच होणार".....

"काका असं नाहीये... सरुवर माझा खूप प्रेम आहे मी होईल successfull मोठा माणूस बनून दाखवेल तुम्हाला, सरुला खरंच खूप खुश ठेवणार".....

“तू काय मोठा होशील आणि जेव्हा होशील ना तेव्हा ये माझ्याकडे विचार करेंन मी तेव्हा, आहे तुझ्याकडे महिनाभर कर काय करू शकतो ते”...... हे असं अगदी रागात म्हणत सरु चे बाबा तिथून निघून गेले.....

हे ऐकून अरुल एकदम शांत होऊन तिथंच थांबला.... अश्या त्याला जसा तसा घरी घेऊन आला.... आज नंतर अरुल ने अश्या समोर सरु चा नाव कधी काढला नाही व अश्या नेही विषय जर कधी मांडला तर अरुल फक्त ऐकायचा... जणो तो सरुला ओळखतच नाही आज ५ दिवस झाले संध्याकाळ ची वेळ काय तरी ७:०० वाजले... होते अरुल मैदनात झाडाखाली बसला होता एक दम गुमसुम शांत व काही क्षण नन्तर अरुल स्वस्त झाला व उठून तिथून निघतच होता कि तिथं अश्या आला..

“भावा काय तू इथं एकटा बसलाय काय बोलशील का”... अरुल ने काय उत्तर नाही दिलं.... अश्या थोडा उदास होऊन बोलला.... “अरुल सरु चे लग्न ठरलय पुढ्याचा महिनाला तिचं लग्न आहे आणि आताही जर तू काय केलं नाहीस मग तर गेलाच समज तुझा प्रेम”..... अरुल काहीच नाही बोलला हे ऐकून पण....

अश्या अरुलला ओरडून बोलला रागात..... “काय चाललेय काय तुझा मनात अरुल तिचासाठी एवढं केला तू आणि आता जेव्हा वेळ आली आहे तेव्हा तू असा शांत झालाय काय ठरवलंय तू सांगशील काय.... जर असाच रहायला तर सरु तुला कधीच नाही भेटणार अरे सोड ना नाही ऐकत घरचे तर सोड पळवून घेऊन ये तिला भेंडी गेला सगळं उडत काय एवढा विचार करतोय”......

“अश्या खूप केलास यार तू माझासाठी अमच्यासाठी... पण यार एवढा सोपा नाहीये... कि मी तीला पळून अनु लग्न करू तिचा आई बाबा किंवा माझे आई बाबा ची काय इजत राहणार समाजमध्ये काय नाक रहातील सांग मला भाई”..... अरुल अगदी शांत व हळू स्वरात बोलला

“अरुल तुला काय झालाय तू कधीपासून समाज चा विचार करू लागला यार”.....

“अश्या........ प्रेम मात्र प्रेम असतं.... आज कळलं कि प्रेमाला अर्थ असतं”... “आज समजला कि लोक प्रेमात sucide का करतात का आपला जीव इतकं सरल पणे देऊन टाकतात... कारण कि प्रेम मात्र त्यांना कमजोर बनवून टाकतो... विचार नाही करता जमत त्यांना कि कोणाची बाजू घ्यावी... जन्म देणार पालकांची... कि साथ देणार साथीदार ची... कोणाचा विश्वास मोडावं.... कोणाला सांगावा, सरु काय आणि कशात अडकून आहे हे कळतंय मला एका मुलीसाठी हे सोपं नाहीये कि आपल्या आई बाबा ज्यांनी आपल्याला जन्म दिलं त्यांना एक झटक्यात असं सोडून जाणं नन्तर लोक आपल्या पालकांना खास करून मुलींच्या पालकांना कश्या नजरेने बघतात माहित आहे मला”...

“अश्या.... अश्या काय सांगू यार तुला.... कसं समजावू तुला कि.... प्रेम यार अजीब आहे हे... कोणाला बलवान तर कोणाला कमजोर बनवून सोडतं... प्रेमात कोणाची हार होते तर कोण जिंकतो... प्रेमात कोण हसतो तर प्रेमात कोण रडतो... नसीब वाले आहे ज्यांना त्यांचं खरं प्रेम मिळाला... बदनसीब आहे ते लोक ज्यांचा प्रेम अधुरा रहायला...”

“प्रेम मात्र प्रेम असतं पण आज कळलं कि प्रेमालाही अर्थ असतं”...

“नौकरी शिक्षण जात पैसा .... आज नाही पण आधीपासून प्रेमाची तुलना याच वस्तूंनसोबत लोक करतात...

अर्थ चा विचार करणं व्यर्थ आहे... प्रेम जीवनात भेटला तेच सर्वश्च आहे”.....

आज अरुल चे हे विचार त्याचा व्यक्तिमत्व जाणून देत होते....

अरुल बोलला.... "अश्या मला नाही माहित कि पुढे काय होईल सरु आणि माझे लग्न होणार कि नाही, पण हे मात्र मला खात्री आहे कि तिचावर माझा प्रेम कधी कमी होनार नाही... माझा पहिला प्रेम माझी स्वप्न सुंदरी माझा जीव आहे ती... नाही विसरणार मी तिला"...अश्या ने अगदी शांत पणे ऐकून घेतलं व अरुलला समजून घेतलं....

अरुल चे विचार खरंच खूप मोठे होते पण मात्र ह्या विचारणं मुले काय सरु भेटेन त्याला...हेच आहे प्रेम मित्रानो प्रेम करणं सोपं आहे पण त्या प्रेमाच्या बंधनाला त्या विश्वास त्या प्रेमाच्या वचनांना पूर्ण करणंच प्रेम आहे... किती love story अशी आहे कि त्यांना आपला प्रियकर नाही भेटत पण मनात मात्र तो पहिला प्रेम राहून जात.....

रात्र दिवस असेच जात होते.... असा वाटत होतं कि अरुल ने सरु चा विचार सोडून दिलाय... आणि इथं सरु ने पण हेच आपल नसीब आहे असा विचार करून जे घरचे सांगताय ते करू लागली....

अरुल रोज वेळेवर कामावर जातोय वेळेवर घरी येऊन जेवण करून आई बाबा सोबत रोज गप्पा गोष्टी करून झोपून जायचा... life अगदी simple... आणिप्रमाणे जगू लागला...

सरुच्या घरी जोर शोर ने लग्नाची तयारी चालू होती... सरु खूप उदास होती मनाला हव तस काहीच होत नव्हत... पण शेवटी काय करू शकते तीही...

भरपूर दिवसां नन्तर आज पूजा आणि अरुल ची भेट झाली... खरं तर पूजाला अरुलला काय तरी महत्वाचा सांगायचं होतं... म्हणून पूजा अरुल ज्या रस्त्या वरून रोज कामावरून यायचा त्याच रस्त्याला पूजा अरुल ची वाट बघत

थांबली होती... अरुल कामावरून येत होता तेव्हाच रस्टायत त्याला पूजा भेटली... पूजाला बघून अरुल थांबला आणि बोलला......

"hiiii... पूजा कशी आहेस"...

पूजा अगदी रागात चिडून बोलली..... "अरुल तू इतका normal कशा राहू शकतो म्हणजे हेच होता का तुमचं प्रेम, ..... तिचं लग्नं ठरलंय, आता तरी काय कर"...

"कशी आहे सरु ठीक आहे ना"... अरुल ने अगदी उदास मनाने व प्रेमाने विचारलं

अरुलच्या या प्रश्णाचा पूजा ने काय उत्तर दिला नाही... पूजा शांत होऊन अरुलकडे रागाने पाहू लागली... व काही क्षण नन्तर बोलली.... "अरुल ऐक मी समजते कि तू कोणत्या situation मध्ये आहेस पण विचार कर काय तरी कर"....... व असा अगदी रागात पूजा बाय बोलून तिथून निघून गेली...

अरुल घरी निघून आला.. "आई चहा दे ना".... "हाँ देते बस".... तितक्यात अश्या चा phone आला..

"कुठे आहेस आता लगेच भेट काम आहे"......

"ठीक आहे भेटतो".....

अरुल अश्याला भेटायला आला... अश्या अरुल ची वाट बघत थांबला होता... व अरुल पोचला तिथे..

"बोल अश्या काय झाला".....

“अरुल, सरुचं लग्न ठरलंय आणि तारिक जवळ येतेय उद्या तिचं साखरपुडा आहे”....

“हो महित आहे मला”...

“म काय ठरवलं आहे तू”...

“काहीच नाही”...?

अरुल खाली मान टाकत बोलत होता... अरुलला स्वतःची लाज वाटत होती... कि असं कसं तो हरू शकतो सरुला कसं सोडू शकतो... तेव्हाच अरुलला आठवलं जेव्हा त्याने हॉस्पिटलमध्ये त्याचाबाबांना सांगितलं होतं कि मला एक प्रयत्न करू द्या... हे आठवून अरुल खूप उदास झाला... अरुलला सरु चा चेहरा डोळ्यांन समोर दिसू लागला... आणि अरुलला सगी जुनी आठवणी आठवली प्रेमात ते बोलणं... सरु चा लाजून हसनं, कधी भांडण... तर कधी शायरी बोलून सरुला मनवनं... व अरुलला आठवलं कि तो सरुला एक दिवस बोलला होता..... “काहीही झाला तरी कधी मला सोडून जाऊ नकोस मी नाही राहू शकत तुझाशीवाय सरु नाही राहू शकत”......

अश्या ओरडून ओरडून बोलत होता....” अरे भावा बोल काय तरी कुठे हरवलास... ऐकतोय का मी काय बोलतोय”.... अरुल तेव्हा एक दम उदास आवाजात बोलला....

“अश्या मला सरुला भेटायचं आहे आता”...

अश्या बोलला.... “आता बोलास ना भाई तू अरुल सारखा चल मी काय तरी जुगाड लावतो भेट तू सरुला”...

अश्या आणि अरुल दोघं सरुच्या घरा जवळ गेले... सरु चे आई बाबा बाहेर बसले होते... अश्या बोलला..... “अरुल ऐक पाठच्या रस्त्याने घूस direct घरात काय झाला तर मी आहे बघतो... तिचे आई बाबा बसलेत बाहेर काय झाला तर तुला call करेंन मी मग तू निघ लगेच”.....

अरुल बोलला ठीक आहे... अरुल पाटाच्या रस्त्याने भिंतुवरून उडी मारून सरुच्या घरात शिरला... लपत लपत तो घरामध्ये आला.. सरु घरात कुठेच नव्हती... मग अरुल ने मांड्यावर बघितलं सरु तिथं झोपली... होती

अरुल ने सरुला प्रेमाने गालावर हाथ फिरवत उठवलं...

“सरु हे माझी sweet heart... उठ शोना”....

सरु उठली आणि अरुलला समोर बघून आधी तर shock झाली आणि घाबरून बोलली.... “अरुल तू इथं कोणी बघितलं तर अरुल तू जा इथून”...

“सरु सरु शांत हो शांत हो शोना”... अरुल ने सरु चे दोनी हाथ त्याच्या हाथ घेतले व तिला प्रेमाने शांत करून समजवलं...

सरु शांत झाली व लगेच अरुलला चिपकून रडायला लागली....... “अरुल हे सगळं काय झाला काय चालू आहे मला नाय काय समजत कि काय करू”.....

“सरु शांत हो रडतेस का... अरे मी आहे ना अजून इथं रडू नकोस होईल सगळं ठीक तू काळजी करू नकोस सगळं ठीक होईल”..... अरुल अगदी प्रेमाने सरुला समजवत बोलला...

“कसा ठीक होईल अरुल उद्या साखरपूडा आहे मग काय नाय होऊ शकणार अरुल”...

"सरु होईल भरोसा ठेव माझ्यावर, ऐक शोना तू काय नको करूस घरचे जसं सांगताय तस कर... हेच आपलं नशीब होतं"....

"अरुल काय बोलतोय तू"....

"हो सरु... जे होईल ते होईल"...

"म्हणजे तू मला सोडून जाशील विसरशील मला"....

"सरु ऐक तुला पळून नाही घेऊन जाऊ शकत मी... तुलाही तसं करायचं नाहीये... आणि तुझे बाबा नाही ऐकत काहीच नाही ऐकत बोल तू मी काय करू"....

"अरुल मनव ना बाबांना sorry बोल माफी मांग काय तरी कर"....

"सरु सगळं करून झाला पण तुझे बाबा नाही ऐकत आता तूच सांग मारून टाकू का त्यांना".... अरुल अगदी रागात चिडून बोलला... सरुला

"अरुल हे काय बोलतोय तू"...

"शोना ऐक sorry... तू माझा ऐक नशिबात असेल तर भेटू चल जातो मी".... अरुल जाऊ लागला तिथून

अरुल थांब म्हणत सरु ने अरुलला मितीत्त घेतला व खूप रडूलागली... आणि अरुल तसाच तिथून निघून आला.... आणि सरु तिथं अरुल, अरुल थांब म्हणत रडत ऱ्हाइलीं

अश्या ने जसं अरुलला बघितलं तसं एकदमच प्रश्नं करू लागला..... "अरुल काय झाला काय बोलली सरु"....

"काय नाय अश्या सोड चल बसूया कट्यावर"... अरुलला काहीच समजत नव्हता कि काय करावा... अरुलला रागही खूप येत होतं कि आपलं प्रेम मिडवण्यासाठी काय करू शकत नाहीये... अरुल चा चेहरा उतरला होता... व त्याची हालत त्याचा चेहऱ्यावरून दिसत होती... अश्यालाही समजत होतं म्हणून अश्या नेही पूडे काय विचारलं नाही...डोघ कट्यावर येऊन बसले.... थोड्या वेळ नन्तर अरुलला त्याचा बाबांचा फोन... आला कि लवकर घरी ये...

अरुल धावत घरी पोचला घरी बघतोय तर सरु चे बाबा येऊन बसले होते... अरुलला बघताच रागात विचारू लागले कि कुठे आहे माझी मुलगी तिला कुटून पण माझा जवळ आण... अरुल चे बाबा उठले व सरुच्या बाबांना शांत करू लागले.. आणि बोले धीर धरा काय नाय होणार सरुला, ठीक असणार सरु ठीक असेंल ती... शांत व्हा येईल ती...

सरु चे बाबा काय ऐकत नव्हते... नाही मला माझी मुलगी हवी आहे बस्स... अरुलला काय समजत नव्हत... कि काय चालू आहे अरुल ने घाबरतच विचारलं कि काय झाला सरुला... कुठे गेली ती तेव्हा सरुच्या बाबाने खिशातून एक पत्रकडून रागात अरुलच्या तोंडावर फेकलं... अरुलने पत्र उचला व बघितलं...पत्रमध्ये लिहलं होता कि...

"बाबा आई.... माफ करा मला मी सगळयांची गुनेहगर आहे आणि अरुल ची पण... मी कोणाला खुश नाही ठेऊ शकली ना अरुलला ना तुम्हाला आणि म्हणूनच जातेय मी खूप लांब"....... सरु

हे वाचताच अरुलच्या डोळयातून पाणी आला अरुल रडत रडत धावत घरा बाहेर आला... आणि अश्याही अरुलच्या मागे धावत त्याचा पाठलाग करू लागला.... अरुल धावत धावत संगीकडे सरुला शोधत होता बाजारात रस्त्यात सरु कुठेच दिसत नव्हती... अरुल कसा बसा झालंता ... अरुल ची तर अगदी हालत

झालंती... सरुला शोधत शोधत तो स्टेशनवर पोचला संगीकडे वेड्या सारखा सरुला शोधत होता तेव्हा त्याचा लक्ष गेला... एका कोपऱ्यात एक मुलगी कचेहऱ्यावर ओढणी बांधून बसली आहे... अरुल तिच्या जवळ गेला व हळूच बघितलं व त्याचा मनाला शांती भेटली... ती सुरूच होती, सरुला बघून अरुल खुश झाला पण अजूनही तो रागात होता... अरुलला बघताच सरु बोलली.....

“आलास तू जसं तस मी स्वतःला मनवून घर सोडून निघाली होती आता का आलास तू”...

अरुल ने रडत डोक्यावर हाथ मारला.... आणि काय विचार न करता रागात सटकन सरुला चापट मारली... सरु रडू लागली आणि बोलली..... “काय पण कर पण मी नाही येणार.... मार अजून मार मला पण मी नाही येणार... अरुल तू का आला इथं, अरुल मला नाही रहायचा तुझाशीवाय”....

अरुल ने सरुला जवळ घेतलं आपल्या मितीत्त घेऊन सरु समोर खूप रडला ... सरु पण खूप रडत होती... अरुल बोलला... सरु चल घरी... म्हणत सरु चा हाथ पकडून अरुल सरुला घरी घेऊन... आला

अरुल सरुला त्याचा घरी घेऊन आला सरु तिच्या बाबांना बघून घाबरून अरुलच्या मागे लपली... तेव्हा  अरुल बोलला....

“हे घ्या काका तुमची मुलगी ... सही सलामत आहे घेऊन जावा तिला म्हणत सरु चा हाथ तिच्या बाबांचा हातात दिला”...

सरु अरुल चा हाथ सोडत नव्हती पण अरुलही मजबूर होता... तो खाली मान टाकून उभा होता आणि सरु अरुलकडे एक तक बघत होती...

सरु चे बाबा अरुल समोर बघत बसले होते... व नन्तर काय न बोलता सरु चा हाथ पकडून तिला ओळत घरी घेऊन आले.... सरु चे बाबा अगदी शांत पणे

सरुला बोलले.. जा वर माळयावर जाऊन बस... उद्याची भरपूर तयारी करायची आहे..... जा"...

अरुल चे बाबा अरुलला बोलले आज मला गर्व आहे कि तू माझा मुलगा आहेस... अरुल चे आई बाबा नि अरुल चा खूप कौतुक केला...... पण अरुल खूप शांत होता... अरुल ने त्याचा बाबाला मिति मारली... व बोलला... "बाबा मी हारलो, इतके प्रयत्न करून पण सरुला नाही मिळवू शकलो"....

अरुलच्या बाबांनी अगदी सहज पणे उत्तर दिलं... "अरुल प्रेमात हार, जीत नसते... कोणालाही समजवायला एक क्षण खूप असतो... आणि प्रेमात बाळा कधीही काय पण होऊ शकतं.. अजून वेळ गेली नाहीये".....

बाबांन च बोलणं ऐकून अरुल जरा स्वस्त झाला.... आणि बाबा सहित आईला पण मितीत्त घेतलं... आणि हसत बोलला... "साखर पुड्यात अपूण पण जायचं ना.... काय आई तुझ्या सुने चा साखर पूडा आहे जावा लागणार ना"....

हे ऐकून सरु चे आई बाबा... जोर जोरात हसू लागले... व अरुलला बोलले... "काय नाय बाळा चल सगळं ठीक होऊन जाईल"....

अरुल सकाळी पहाटेच उठला... व आईला कामला जातोय सांगून निघून गेलं... खरं तर आज अरुलचं मन नव्हतं अरुल कोणाला... न सांगता एकटा मैदानात येऊन बसला... विचार करू लागला... सुरू बद्दल, व सरुला आठवत डोळे बंद करून बसला.... खूप वेळ असाच निघून गेला... व काही क्षण नंतर अरुल ने परत डोळे बंद केले... व अरुलला एक ड्रीश्या दिसला... ज्यात भरपूर लोक जमले होते.... सरु चे आई बाबा, व अरुल ने आपल्या आई बाबालाही बघितलं सगळे जण खूप खुश होते... आई बाबा पण खुशीने हसत होते आणि stage वर त्या मुलाने सरुला अंगठी घातली... व सरु नेही अंगठी त्या मुलाच्या हातात घातली... अरुल ने एकदमच

डोळे उघडले... व समोर बघतो तर काहीच नाहीये... ना तो मुलगा ना सरु... ना आई बाबा... संगीकडे खूप शांतता होती... अगदी असा वाटत होतं अरुलला कि जगात मात्र तो एकटाच आहे... आपल्याच शांतता सोबत भांडत अरुल ने होत उघडले... व शब्द काय अशे फुटले....

"रंग तो तुझा प्रेमाचा अजून ओटावर आहे...

साज तो तुझा अजूनही मनात आहे....

जगे पर्यंत हा स्वाश तुझाच रहाणार....

तू आज भले जीवनात नाही...

पण मी नेहमी तुझाच रहाणार".... असं म्हणत जेव्हा अरुल ने समोर पाहिलं तर बघून एकदम दचकून उठला... समोर सरु थांबली होती... चांगलीच नथुन थटून.. अगदी कुठल्यातरी महाराणी सारखी दिसत होती... पण इथं अरुलच्या मनात वेगच काय तरी चालू होतं अरुल ने घाबरतच विचारलं....

"सरु तू इथं, इथं कशी काय तुझं तर साखरपूडा आहे ना आज... तू इथं कशी आलीस".... अरुल ने थोडं रागवून विचारलं... "सरु तू परत पळून अली आहेस, चल तू घरी चल आधी"... असं म्हणत अरुल ने सरु चा हाथ पकडला... तिला घेऊन जात होता तेव्हाच सरु ने हाथ झटकला... आणि बोलली.....

"हो पळून आली आहे मी"..... सरु ओरडून बोलली... "अरुल कसा झाला आहेस तू स्वतःकडे बघ जर देवदास दिसतोय"....

"सरु हि मस्करी ची वेळ नाहीये तू आधी सांग पळून आलीस तू"...

तेव्हाच पाठून अरुलला ऐकायला आलं.... “पळून नाही आली सरु, मीच तिला पळवून टाकलं घरातून”....

अरुल ने जेव्हा वळून बघितलं तर सरु चे बाबा बोलत बोलत  येत होते... व त्यांच्या पाठी सरु ची आई, आई बाबा, अश्या पूजा सगळे येत होते....

सगळयांना असं समोर एकदम बघून अरुलला काही कळत नव्हतं कि नेमकं काय चाललेय... अरुल काय विचारेन त्या आधी सरु चे बाबा... एकदम प्रेमाने बोलले...

“अरुल चुकी झाली माझी... मी तुला नीट ओळखलं नाही, मला वाटायचं कि प्रेम हे सगळं काय नसतं, आज कालच्या पोरांसाठी girlfreind, boyfreind हे सगळं तर खेळ झाला आहे... मला भीती होती कि माझ्या पोरी सोबत पण तसलं काय घडायला नको.. म्हणून मी तुमच्या प्रेमाच्या खिलाफ होतो... मला वाटायचं कि तूही इतर मुलांसारखं वागशील आधी असं गोळ बोलून मग.... पण नाही काल जे काय झालं त्यांनतर मला कळलं कि तू चांगला आहेस... व्हाईट नाहीयेस तू... काल जर तुला हवं असलं असत तर तू सरुला पळवून घेऊन जाऊ शकला असता पण तू असं नाही केलंस... सरुला तू माझ्याकडे येऊन सोपलं... हे महित असताना पण कि मी तुझे आणि सरुच्या लागण्याच्या खिलाफ आहे, तेव्हाच मी विचार केला कि सरुसाठी जर कोण चांगला मुलगा आहे तर तो तू आहेस... तुझापेक्षा चांगला मुलगा माझ्या सरुला जगात कुठे मिळणार नाही”.... असं बोलत सरुच्या बाबांनी हाथ जोडले व बोलले... “एक दिवस सरुसाठी तू माझ्या समोर हाथ जोडले होते आज मी हाथ जोडतो कि.”.... हे बघून सरुच्या डोळयातून पाणी आलं...आणि अरुल ने सरूच्या बाबांचे हाथ पकडले व बोलला....

“हाथ जोडू नका.. तुम्ही मोठे आहात, तुम्ही पण तुमच्या जागेवर बरोबर होते... तुमचं पण काही नाय चुकलं”...  व हे ऐकून सरुच्या बाबांनी हासत हासत ख़ुशी कुशी ने... सरु चा हाथ अरुलच्या हातात दिला... व बोलले... “हे घे तुझी सरु कोन पण तुम्हाला वेग नाही करु शकत”....

अरुल ने स्मिथ हास्य सोबत सरुच्या बाबांना बघितलं व आई बाबांना बघून... सरु चा हाथ घट पकडला... आणि प्रेमाने सरु समोर बघू लागला.... तेव्हाच अश्या आला व अरुलच्या पाठी हाथ मारत बोलला... “बघ भाई झालं ना”....

तेव्हाच सरु चे बाबा बोलले... “नाही अजून नाही झालं... मी ऐकलं आहे कि तू शायरी खूप चांगली करतो.. बघ मला शायरी तर कळत नाय पण... आता सरु भेटली तुला मग प्रेमाने एक उखाणा होउदे..... काय बरोबर ना”.....

व सगळे जण जोर आवाजात बोलले हाँ बरोबर....

अरुल सरुकडे बघत होता व सरुही लाजत अरुलकडून नजर लपवत त्याला बघत होती आणि अरुल बोलला...

“जीवनात येतो एकदा प्रेमाचा वळू, सरु चा नाव घेतो हाथ जोडून”....

व उखाणा ऐकून सगळे जोर जोरात हसू लागले... व सरु ने अरुल चा हाथ पकडलं आणि प्रेमाने बोलली... “Love U So Much अरुल”... आणि अगदी प्रेमाने अरुल ने उत्तर दिलं “Love U To सरु”.....................................................................................
..........................................................................................

And The Happy Ending ............

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे

जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा .

हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व 7710980841किंवा गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे .